नोव्हेंबर / November
रविवार / Sunday
दि.०८ / Dt: 08
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ८ पाने Pages 6

३ किंमत रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com

पुणे-पिंपरी चिचवड, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, जालना, नांदेड या एकाचवेळी स्वंतत्ररित्या प्रकाशित होणारे एकमेव दैनिक



महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — रविवार दि.०८ नोव्हेंबर २०२६ — पान नं. २

कचऱ्याच्या पोत्यात सापडले दोन पाय... एका छोट्याशा वस्तूने उघडले हत्येचे गूढ

पिंपरी । प्रतिनिधी

चिंचवडमधील पिंपळे गुरव परिसरात घडलेल्या एका भीषण हत्याकांडाने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. दारू पिण्यावरून झालेल्या वादातून एका मित्रानेच आपल्या मित्राची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एवढेच नव्हे, तर हत्या केल्यानंतर पुरावा लपवण्यासाठी आरोपीने मृतदेहाचे दोन पाय कापून ते कचऱ्याच्या पोत्यात टाकल्याचे तपासात उघड झाले आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रकरणी सांगवी पोलिसांनी वेगाने तपास करत अवघ्या १२ तासांत हत्येचा उलगडा केला. विष्णू कुंभार असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, अनिल खाडे असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळे गुरव परिसरात कचऱ्याच्या पोत्यात पुरुषाचे दोन पाय आढळून आले. ही बाब समोर येताच परिसरात एकच खळबळ उडाली. पोत्यात मानवी शरीराचे अवयव आढळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच सांगवी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून तपास सुरू केला. सुरुवातीला मृत व्यक्तीची ओळख पटवणे आणि या घटनेमागील आरोपीचा शोध घेणे, हे पोलिसांसमोरील मोठे आव्हान होते. मात्र, पोलिसांनी घटनास्थळी मिळालेल्या वस्तूंची बारकाईने तपासणी सुरू केली. याच तपासादरम्यान पोलिसांच्या हाती एक महत्त्वाचा पुरावा लागला. कचऱ्याच्या पोत्यात पोलिसांना एक सिमकार्डचे कव्हर आढळले. तपासाच्या दृष्टीने ही वस्तू महत्त्वाची ठरली. पोलिसांनी या कव्हरच्या आधारे तपास केला. त्यानंतर मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित व्यक्तीचा शोध सुरू केला.

या तपासातून पोलिसांना संशयित आरोपीपर्यंत पोहोचण्यात यश आले. पोलिसांनी विष्णू कुंभार याच्याबाबत माहिती मिळवत त्याच्या घरापर्यंत धाव घेतली. तेथे तपासणी केली असता अनिल खाडे यांचा उर्वरित मृतदेह आढळून आला. त्यामुळे या हत्याकांडाचा उलगडा होण्यास मोठी मदत झाली.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अग्निशमन विभागाचे संवेदनशील स्थळांवर विशेष लक्ष

आगीच्या दुर्घटना रोखण्यासाठी विशेष पथकामार्फत शहरभर गस्त; २५० कर्मचाऱ्यांसह संपूर्ण अग्निशमन यंत्रणा सज्ज

पिंपरी । प्रतिनिधी

दिवाळीचा सण आनंदात आणि सुरक्षित वातावरणात साजरा करता यावा, तसेच सणाच्या कालावधीत आगीच्या संभाव्य दुर्घटना टाळता याव्यात, यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत संपूर्ण तयारी करण्यात आली आहे. उप आयुक्त व्यंकटेश दुर्वास यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या या विशेष मोहिमेचे नेतृत्व उप अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले व श्रीकांत वैरागर करत असून सदर मोहिमेसाठी अग्निशमन विभागाचे २५० कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. यासोबतच २० मोठी अग्निशमन वाहने आणि ७ ते ८ वाहनांच्या माध्यमातून शहरभर गस्त घालण्यात येणार आहे. शहरातील गर्दीची ठिकाणे, संवेदनशील परिसर आणि आगीच्या घटना घडण्याची शक्यता असलेल्या सुमारे २२ स्थळांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.



दिवाळीच्या कालावधीत फटाक्यांची आतषबाजी, विद्युत रोषणाई, दिव्यांचा वापर तसेच बाजारपेठांमधील वाढती गर्दी यामुळे आग लागण्याच्या घटनांची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत विशेष दक्षता घेण्यात येत आहे. मागील वर्षी दिवाळीदरम्यान आगीच्या सुमारे ७० घटना घडल्या होत्या. या घटनांचा अभ्यास करून संभाव्य धोके लक्षात घेण्यात आले असून, त्यानुसार शहरातील विविध ठिकाणांची पाहणी करून विशेष लक्ष ठेवण्यासाठी ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत.

अग्निशमन विभागातील सर्व कर्मचारी दोन शिफ्टमध्ये कार्यरत राहणार असून, शहरातील अग्निशमन केंद्रांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दिवाळीच्या कालावधीत सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द करण्यात आल्या असून, आपत्कालीन परिस्थितीला तातडीने प्रतिसाद देण्यासाठी २४ तास यंत्रणा कार्यरत ठेवण्यात येणार आहे. शहरात नियमित गस्त घालण्यासाठी लहान अग्निशमन वाहने तसेच आग लागल्यास तातडीने घटनास्थळी पोहोचून आग नियंत्रित करण्यासाठी मोठी वाहने सज्ज ठेवण्यात आली आहेत. शहरातील शगुन चौक, फुगेवाडी, पिंपळे गुरव, लांडगे नाट्यगृह परिसर, मॅगझिन चौक, त्रिवेणीनगर, तापकीर चौक, चिंचवड लिंक रोड, वाकड, दत्त मंदिर रस्ता, डांगे चौक, जगताप डेअरी, रावेत आणि मुकाई चौक यांसह शहरातील विविध संवेदनशील स्थळांवर अग्निशमन विभागाकडून विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. या परिसरांमध्ये नियमित गस्त, परिस्थितीचा आढावा आणि आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

पिंपरी-चिंचवडमधील अग्निशमन केंद्रांचे संपर्क क्रमांक

१. पिंपरी (मुख्य) – ९९२२५०१४७५
२. भोसरी – ९९२२५०१४७६
३. प्राधिकरण – ९९२२५०१४७७
४. रहाटणी – ९९२२५०१४७८
५. चिखली – ८६६९८९४१०१
६. तळवडे – ९५५२५२३१०१
७. थेरगाव – ७०३०९०७९९९
८. मोशी – ७२६४९४३३३३
९. चोवीसावाडी – ७७५८९९२८१७
१०. नेहरूनगर – ८४८४८८४१०१

दिवाळीच्या काळात नागरिकांची सुरक्षितता ही महानगरपालिकेची सर्वोच्च प्राथमिकता आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी अग्निशमन विभागाला आवश्यक मनुष्यबळ आणि साधनसामग्रीसह सज्ज ठेवण्यात आले आहे. प्रशासनाच्या प्रयत्नांना नागरिकांनीही सहकार्य करून सुरक्षिततेचे नियम पाळावेत आणि आनंदी व सुरक्षित दिवाळी साजरी करावी.
– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मागील वर्षातील घटनांचा अभ्यास करून शहरातील २२ संवेदनशील ठिकाणे निश्चित केली आहेत. २५० कर्मचारी, २० मोठी अग्निशमन वाहने आणि गस्ती वाहनांद्वारे २४ तास गस्त घालण्यात येणार आहे. नागरिकांनीही फटाके फोडताना आवश्यक खबरदारी घ्यावी आणि कोणतीही दुर्घटना घडल्यास तातडीने अग्निशमन विभागाशी संपर्क साधावा.
– व्यंकटेश दुर्वास, मुख्य अग्निशमन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

१० हजार रेशनकिटच्या माध्यमातून आदिवासी कातकरी बांधवांची दिवाळी केली गोड; आमदार सुनील शेळके यांचा मायेचा आधार!

मावळ । प्रतिनिधी

दिवाळी म्हणजे आनंदाचा, प्रकाशाचा आणि आपुलकीचा सण! मात्र समाजातील शेवटच्या घटकापर्यंत या आनंदाचा प्रकाश पोहोचला, तरच सणाचे खरे सार्थक होते. याच भावनेतून मावळचे आमदार सुनील आण्णा शेळके यांच्या वतीने तालुक्यातील आदिवासी कातकरी कुटुंबांसाठी 'मायेची दिवाळी' हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत तब्बल १० हजार रेशनकिटचे वाटप करण्यात आले असून, या उपक्रमामुळे अनेक आदिवासी कुटुंबांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित झाला आहे.

विशेष म्हणजे, कोणताही मोठा गाजावाजा किंवा प्रसिद्धीचा सोहळा न करता आदिवासी पाड्यांवरील कुटुंबांपर्यंत जीवनावश्यक वस्तूंचे रेशनकिट पोहोचविण्यावर भर देण्यात आला. सणासुदीच्या काळात आर्थिक परिस्थितीमुळे अनेक



कुटुंबांना आवश्यक वस्तूंची जुळवाजुळव करावी लागते. अशा वेळी मिळालेला हा मदतीचा हात त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलवणारा ठरला. आमदार सुनील शेळके आणि मावळातील आदिवासी कातकरी बांधव यांच्यातील ऋणानुबंध केवळ सणासुदीपुरते मर्यादित नसून, त्यांच्या दैनंदिन अडचणी आणि मूलभूत प्रश्नांशीही जोडलेले आहेत. आदिवासी बांधवांना जातीचे दाखले मिळवून देणे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे, शिक्षणाच्या प्रवाहात त्यांना टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे, तसेच त्यांच्या विविध नागरी आणि मूलभूत सुविधांच्या प्रश्नांकडे लक्ष देणे, अशा बाबींमध्ये आमदार शेळके सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे सांगितले जाते.

राजकारणात अनेकदा मोठमोठे कार्यक्रम, भाषणे आणि प्रसिद्धीचे सोहळे पाहायला मिळतात. मात्र एखाद्या गरजू कुटुंबाच्या घरातील चुल पेटावी, मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा आणि त्यांच्या घरातही दिवाळीचा प्रकाश पोहोचावा, यासाठी केलेला छोटासा प्रयत्नही माणुसकीचे मोठे दर्शन घडवतो. मावळातील आदिवासी पाड्यांवर पोहोचलेली ही मायेची भेट त्याच भावनेचे प्रतीक ठरली आहे. 'मदत नव्हे, कर्तव्य' या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे आदिवासी कातकरी बांधव आणि आमदार सुनील शेळके यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. दिवाळीच्या दिव्यांसोबतच आदिवासी कुटुंबांच्या मनात समाधानाचा आणि आपुलकीचा प्रकाश निर्माण करणारी ही मायेची दिवाळी मावळच्या सामाजिक जिव्हाळ्याचे दर्शन घडवणारी ठरली आहे.

कार्तिकी यात्रा २०२६ निमित्त आळंदीत अखंड हरिनाम उत्सवाचे आयोजन; पसायदान मंच, इंद्रायणी घाट येथे रंगणार भक्तिरसाचा सोहळा

आळंदी । प्रतिनिधी

श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आळंदी येथे कार्तिकी यात्रा २०२६ च्या पर्वकाळात दिनांक २ ते ६ डिसेंबर २०२६ या कालावधीत अखंड हरिनाम उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवाच्या माध्यमातून भाविकांना कीर्तन, प्रवचन, हरिपाठ व संगीत भजनसेवेचा आध्यात्मिक लाभ घेता येणार आहे. उत्सवामध्ये नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार तसेच गायक कलाकार आपली सेवा सादर करणार आहेत. उत्सवाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

उत्सवाचे प्रमुख कार्यक्रम

१) बुधवार, दि. ०२ डिसेंबर २०२६ – सकाळी १० ते १२ : ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज शिंदे, अध्यापक व विश्वस्त, जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, आळंदी. सायंकाळी ४ ते ५ : ह.भ.प. आत्माराम म. शास्त्री यांचे प्रवचन. सायंकाळी ६ ते ८ : ह.भ.प. केशव म. उखळीकर यांचे कीर्तन. रात्री ९ ते ११ : जागर स्त्री शक्तीचा, सूर गृहलक्ष्मीचा – मुख्य गायिका सौ. ज्योतीताई गोहाणे व सहकारी. २) गुरुवार, दि. ०३ डिसेंबर २०२६ – सकाळी १० ते १२ : ह.भ.प. जयंत म. बोथले यांचे कीर्तन. प्रवचन : ह.भ.प. बाळासाहेब म. शेवाळे. सायंकाळी ६ ते ८ : ह.भ.प. बापूसाहेब म. देहूकर, अध्यक्ष, देहू संस्थान यांचे कीर्तन. रात्री ९ ते ११ : प्रसिद्ध गायक श्री. नागेश आडगावकर यांची संगीत भजनसेवा. ३) शुक्रवार, दि. ०४ डिसेंबर २०२६ – सकाळी १० ते १२ : ह.भ.प. डॉ. चेतनानंद म. पुणेकर यांचे कीर्तन. सायंकाळी ४ ते ५ : डॉ. नारायण म. जाधव यांचे प्रवचन. सायंकाळी ६ ते ८ : ह.भ.प. रामराव म. ढोक यांचे कीर्तन. रात्री ९ ते ११ : पंडित कल्याणजी गायखवाड, कार्तिकी गायखवाड, कौस्तुभ गायखवाड व सहकारी यांची संगीत भजनसेवा. ४) शनिवार, दि. ०५ डिसेंबर २०२६ – कार्तिकी एकादशी – सकाळी १० ते १२ : ह.भ.प. समाधान म. शर्मा यांचे कीर्तन. सायंकाळी ४ ते ५ : ह.भ.प. प्रकाश म. बोथले यांचे प्रवचन. सायंकाळी ६ वाजता : एकादशीनिमित्त इंद्रायणी नदीची विशेष आरती. सायंकाळी ६ ते ८ : ह.भ.प. गहिनाथ म. ओसेकर, सहअध्यक्ष, पंढरपूर देवस्थान यांचे कीर्तन. रात्री ९ ते ११ : श्री. ऋषी महाराज पाटील व सहकारी यांची संगीत भजनसेवा. ५) रविवार, दि. ०६ डिसेंबर २०२६ – श्री संत ज्ञानदेवांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त ह.भ.प. केशव म. नामदास यांचे विशेष कीर्तन.

यावेळी नगराध्यक्षा प्रशांत कुर्हाडे म्हणाले की, आळंदी ही संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीमुळे संपूर्ण जगातील वारकरी व भाविकांचे श्रद्धास्थान आहे. कार्तिकी यात्रा हा आळंदीच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेतील अत्यंत महत्त्वाचा उत्सव आहे. या उत्सवानिमित्त पसायदान मंच, इंद्रायणी घाट येथे आयोजित अखंड हरिनाम उत्सवामुळे आळंदी नगरीत भक्तिमय वातावरण निर्माण होईल. वारकरी संप्रदायाची परंपरा, संतांचे विचार आणि हरिनामाचा महिमा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यास या उपक्रमाची निश्चितच मदत होईल. सर्व वारकरी, भाविक आणि नागरिकांनी या उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.

या अखंड हरिनाम उत्सवामुळे आळंदी नगरीत भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण होणार असून, राज्याच्या विविध भागांतून येणाऱ्या वारकरी, भाविक व नागरिकांना संतविचार, हरिनाम आणि कीर्तनसेवेचा लाभ घेता येणार आहे. तरी सर्व वारकरी, भाविक व नागरिकांनी या अखंड हरिनाम उत्सवातील विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन सौ सुजाता तापकीर उप नगराध्यक्ष, माधव खांडेकर, पूजाताई घुडारे यात्रा सभापती, संजय घुंडारे संयोजक यांनी केले आहे

श्री बालाजी हायस्कूलमध्ये दीपोत्सवाचा प्रकाशमय उत्साह; विद्यार्थ्यांनी दिव्यांनी साकारले शाळेचे नाव



पिंपरी । प्रतिनिधी

श्री बालाजी हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये दिवाळीनिमित्त दीपोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रांगणात लुकलुकत्या दिव्यांच्या प्रकाशाने अवघे वातावरण उजळून निघाले होते. या उपक्रमाची संकल्पना प्रा. अमित घेनंद यांची होती. त्यांच्या संकल्पनेतून आणि अथर्व गायकवाड यांच्या अथक प्रयत्नातून हा दीपोत्सव साकार झाला. शाळेतील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन ७२० दिवे लावून शाळेचे नाव साकारले. दिव्यांच्या रोषणाईतून तयार झालेले शाळेचे नाव पाहून उपस्थित पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी दिवाळीचा खरा अर्थ म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे जाणे, हा संदेश दिला. एकता, शिस्त आणि संस्कार या मूल्यांची जपणूक करत विद्यार्थ्यांनी हा उपक्रम यशस्वी केला.

दिव्यांच्या प्रकाशात न्हालेली शाळा, विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे हा दीपोत्सव सर्वांसाठी संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल प्रा.अमित घेनंद, अथर्व गायकवाड, शुभांगी घोगरे शिक्षकवृंद आणि सर्व विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक ज्योत्स्ना फाळके यांनी कौतुक केले.

स्वर्गीय अंकुशराव लांडगे यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजपा कार्यालयात अभिवादन



पिंपरी । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने विद्यमान शहराध्यक्ष नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे यांच्या हस्ते स्वर्गीय अंकुशराव लांडगे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना वंदन करण्यात आले.

यावेळी स्वर्गीय अंकुशराव यांना जिल्हा महामंत्री मोरेश्वर शेडगे, मधुकर बच्चे, नगरसेवक निखिल बोहाडे, चंद्रकांत नखाते, प्रवक्ते राजाभाऊ दुर्गे, संतोष तापकीर, देवदत्त लांडे, रवींद्र देशपांडे, दिलीप राऊत, रविंद्र नादुरकर, रामदास काळजे, संजय परळीकर, मनीष पंजाबी, नंदूकाका भोगले यांसह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या 'एक हात मदतीचा' उपक्रमातून ५१ हजार रुपयांच्या धान्य किटचे वाटप

आळंदी देवाची । प्रतिनिधी

दिवाळीच्या आनंदोत्सवात माणुसकीचा सुगंध दरवळवत श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या विद्यार्थी सहाय्यक समिती च्या वतीने राबविण्यात आलेला 'एक हात मदतीचा' हा सामाजिक बांधिलकी म्हणून असलेला उपक्रम उत्साहात संपन्न झाला. दीपावलीचे औचित्य साधून मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त बांधवांना सुमारे ५१ हजार रुपये किमतीच्या दिवाळीसाठी आवश्यक असलेल्या धान्य किटसाठी निधी वाटप करण्यात आला. आनंदाच्या सणात संकटग्रस्तांच्या जीवनातही आनंदाचा प्रकाश निर्माण करण्याचा संस्थेचा हा प्रयत्न कौतुकास्पद ठरला.

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर बालक मंदिर, श्री ज्ञानेश्वर प्राथमिक विद्या मंदिर तसेच श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्यु. कॉलेज मधील पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि



विद्यार्थ्यांनी यथाशक्ती आर्थिक मदत करत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांची रोषणाई, फराळ आणि फटाक्यांचा उत्सव नव्हे, तर दुसऱ्याच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश निर्माण करण्याची संधी आहे, हा मानवतेचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

'मदत करण्यासाठी श्रीमंत असण्याची गरज नसते, तर मन मोठे असावे लागते. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, परोपकाराची भावना आणि समाजाप्रती जबाबदारी रुजविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आपल्या आनंदातील थोडासा आनंद गरजूंसोबत वाटून घेण्यातच दिवाळीचा खरा आनंद सामावलेला आहे,' असे प्रतिपादन संस्थेचे सचिव अजित वडगावकर यांनी केले. यासाठी मदत केलेल्या सर्व घटकांचे संस्थेच्या वतीने आभार मानले.

या निधी वाटप उपक्रमासाठी संस्थेचे सचिव अजित वडगावकर, विद्यालयाचे प्राचार्य किसन राठोड, उपप्राचार्य प्रशांत सोनवणे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रदीप काळे, विद्यालयाच्या व विद्यार्थी सहाय्यक समितीच्या पर्यवेक्षिका अनिता पडळकर तसेच हेमांगी उपरे, अनुजायीनी राजहंस, विठ्ठलदास गुट्टे, प्रज्ञा यादव, सूर्यकांत खुडे, उज्ज्वला कडलासकर, विद्या वाघुले, सोनाली कातोरे यांनी विशेष सहकार्य केले. तसेच मराठवाड्यातील दुष्काळग्रस्तांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी किसन राठोड, राजाभाऊ पानगावकर, इम्रान शेख, अयोध्या मुंडे आणि एस. व्ही. जाधव यांनी योगदान दिले.

पिंपरी येथील सावली निवारा केंद्रातील बेघर व्यक्तीबरोबर आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांनी केली दिवाळी साजरी

बेघर व्यक्तींशी संवाद साधताना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी भावूक; प्रत्येकाची आस्थेने केली विचारपूस, संस्थेच्या कार्याचेही केले कौतुक

नात्यांची ऊब हरवलेल्यां बेघर बांधवांशी साधला संवाद; 'सावली'त रंगला मायेचा सोहळा!

पिंपरी । प्रतिनिधी

दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि आप्तस्वकीयांसोबत साजरा होणारा जिव्हाळ्याचा सण... मात्र ज्यांच्या आयुष्यात नात्यांची साथ हरवली आहे, ज्यांच्या वाट्याला एकटेपणा आणि निराधारपणाचे दुःख आले आहे, अशा व्यक्तींसाठी सणांचे दिवसही अनेकदा भावनांनी भरलेले असतात. अशाच निराधार माता-पित्यांच्या आयुष्यात मायेचा प्रकाश पसरवण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यंदाची दिवाळी 'सावली' निवारा केंद्रातील ७५ बेघर व्यक्तीसोबत साजरी केली.

यावेळी त्यांनी त्यांचेसोबत दिवाळीचा फराळ करत त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत आपुलकीचा संवाद साधला. या भेटीदरम्यान अनेकांच्या जीवनप्रवासातील वेदना, संघर्ष आणि सावली केंद्राकडून मिळणारा आधार जाणून घेताना आयुक्त भावूक झाले होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या माध्यमातून आणि 'रिअल लाइफ रिअल पीपल' या संस्थेच्या सहकार्याने चालविण्यात येणारे 'सावली' निवारा केंद्र हे बेघर, निराधार आणि वंचित व्यक्तींसाठी हक्काचे घर बनले आहे. रस्त्यावर निराधार अवस्थेत आढळलेल्या, नातेवाईकांपासून दुरावलेल्या, मानसिक व शारीरिक आजारांनी त्रस्त असलेल्या व्यक्तींना या केंद्रात सुरक्षित निवारा, अन्न, औषधोपचार आणि मायेची साथ दिली जाते,अनेकांसाठी हे केंद्र केवळ निवाऱ्याचे ठिकाण नसून आयुष्याच्या उत्तरार्धात लाभलेले एक नवे कुटुंबच आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी या केंद्राला भेट देत येथे दिवाळी सण साजरा केला यावेळी उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह रिअल लाइफ रिअल पीपल संस्थेचे एम. ए. हुसैन, व्यवस्थापक गौतम थोरात, समाजसेवक ग्रस फ्रान्सिस आदी उपस्थित होते. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी



या केंद्रामध्ये दिवाळी साजरा करताना प्रत्येकाची स्वतंत्रपणे आस्थेने विचारपूस केली. तुम्ही येथे कसे आलात, येथे तुमची काळजी कशी घेतली जाते, जेवण आणि औषधोपचार व्यवस्थित मिळतात का, काही अडचणी आहेत का, अशा विविध प्रश्नांतून त्यांनी प्रत्येकाच्या भावना जाणून घेण्याचा प्रयत्न केला. केवळ औपचारिक संवाद न साधता प्रत्येक व्यक्तीसमोर थांबून त्यांचे म्हणणे ऐकून घेत त्यांनी माणुसकीच्या नात्याने संवाद साधला.

या केंद्रातील काहींजणांनी त्यांच्या आयुष्यातील सांगितलेले प्रसंग व त्यांचा संघर्ष हुदयद्रावक होता. आयुष्याच्या प्रवासात कधीतरी माणसांची साथ सुटली, नाती दुरावली; मात्र अशा व्यक्तींना पुन्हा जगण्याचा आधार देण्याचे काम 'सावली'च्या माध्यमातून होत असल्याचे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

संस्थेच्या कर्मचाऱ्यांकडून प्रत्येक लाभार्थ्याची घेतली जाणारी काळजी, त्यांना दिला जाणारा सन्मान आणि आपुलकीचे वातावरण याचेही त्यांनी कौतुक केले.

यावेळी आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून केंद्राच्या कामकाजाची, लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांची तसेच संस्थेला भेडसावणाऱ्या विविध समस्यांची माहिती घेतली. निवारा केंद्र हा अत्यंत चांगला आणि समाजासाठी आवश्यक असलेला उपक्रम असल्याचे सांगत अशा केंद्रांमुळे समाजातील दुर्लक्षित आणि निराधार घटकांना जगण्याचा नवा आधार मिळतो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. केंद्राच्या कामकाजात येणाऱ्या अडचणी जाणून घेत त्यावर आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबतही त्यांनी सकारात्मक भूमिका दर्शवली.

दिवाळीच्या सणानिमित्त आयुक्तांनी दिलेली ही अनोखी भेट लाभार्थ्यांसाठी केवळ एक औपचारिक भेट नव्हती, तर त्यांच्या आयुष्यातील एक जिव्हाळ्याचा क्षण ठरली. पदाचा मोठेपणा बाजूला ठेवून प्रत्येक निराधार व्यक्तीशी आपुलकीने संवाद साधणाऱ्या आयुक्तांच्या भेटीने केंद्रातील वातावरणही भावूक झाले होते तर त्यांच्या भेटीचा सर्वांना झालेला आनंदही जाणवत होता. दिवाळीच्या प्रकाशपर्वात या निराधार माता-पित्यांच्या आयुष्यात मायेचा एक नवा दीप उजळविण्याचे काम या भेटीतून झाले.

सावली निवारा केंद्र हा समाजातील निराधार, बेघर आणि वंचित व्यक्तींना आधार देणारा अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. दिवाळीसारखा आनंदाचा सण या माता-पित्यांसोबत साजरा करताना त्यांच्या भावना जाणून घेता आल्या. प्रत्येक व्यक्तीला केवळ अन्न, वस्त्र आणि निवारा मिळणे पुरेसे नाही, तर त्यांना प्रेम, आपुलकी आणि सन्मानाची वागणूक मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सावली केंद्राच्या माध्यमातून हे काम संवेदनशीलतेने केले जात आहे. केंद्रातील प्रत्येक लाभार्थ्याची काळजी घेणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. संस्थेतील स्थापत्य विषयक समस्या जाणून घेतल्या असून त्यावर आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी महापालिका अधिका-यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

Page 3_Layout 1 11/7/2026 10:31 PM Page 1

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

प्रत्येकाचे स्वप्नाचे घर आता होईल साकार!

होम लोन 7.70% द.सा.द.से.

प्रधानमंत्री आवास योजना

*नियम व अटी लागू

❖ शुभेच्छुक ❖



सचिन वाणी
मुख्य कार्यकारी अधिकारी
प्रियदर्शनी ना.स.बँक म. जालना



सी.ए. भूषण भक्कड
अध्यक्ष, प्रियदर्शनी ना.स. बँक म. जालना



विलास बापू खरात
मा. आमदार (अंबड)
संस्थापक अध्यक्ष प्रियदर्शनी ना. सह.बँक म.जालना

प्रियदर्शनी नागरी सहकारी बँक मर्यादित जालना
विश्वास, सुरक्षा आणि सेवा

'ब्रह्मचैतन्य', देऊळगावराजा रोड, जालना
संपर्क : (०२४८२) २३३३४६

महाराष्ट्र पोलीस

नांदेड जिल्हा पोलिस
आपली सुरक्षा... आमची जबाबदारी...

जातीय सलोखा
आपली ताकद, आपली ओळख !

"धर्म, भाषा, जात वेगळी असली तरी आपण सारे भारतीय एकच आहोत. एकमेकांचा सन्मान करूया, शांतता आणि सलोखा जपूया."

- भेदभाव नको, बंधुभाव हवा
- एकतेतूनच प्रगतीचा मार्ग
- परस्परांचा सन्मान, समाजाचा अभिमान
- शांतता, सहिष्णुता आणि जातीय सलोखा हाच खरा देशभक्तीचा मार्ग

चला, जातीय भेद विसरून
एकत्र येऊया आणि नांदेडला बनवूया
एकता, शांतता आणि प्रगतीचे उदाहरण !

आम्ही वचन देतो जातीय भेदभाव करणार नाही
आम्ही वचन देतो सर्व धर्मांचा आदर करू
आम्ही वचन देतो शांतता आणि सद्भावना जपू
आम्ही वचन देतो कायद्यांचे पालन करून सुरक्षित समाज घडवू

" एकता आपल्या विविधतेत, शक्ती आपल्या एकतेत."

पोलीस अधीक्षक, नांदेड | नियंत्रण कक्ष - 02462234720, +919975629251



तुम्हाला आणि तुमच्या कुटुंबियांना
दिवाळीच्या मन:पूर्वक हार्दिक
शुभेच्छा !

मा. कैलाशसेठ लोया
सुप्रसिद्ध उद्योगक

ही दिवाळी आपल्या जीवनात आनंद, सुख, शांती, समृद्धी आणि उज्ज्वल भविष्य घेऊन येवो, हीच सदिच्छा !

शुभेच्छुक -
राजुरी स्टील
एमआईडीसी जालना

RAJURI STEEL
मजबुत, सुरक्षित, विश्वसनीय.

दीपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा

जैन डेंटल क्लिनिक
दातांचा दवाखाना

उपलब्ध सुविधा

- एक्स-रे द्वारे दंत तपासणी
- दात वाचविणे (रूट कॅनाल)
- फिक्स दात बसविणे.
- वेडयावाकडया दातांवरील उपचार
- दातांवरील पाप्याच्या डागांवर उपचार
- दात स्वच्छ करणे.
- दात काढणे
- कवळी बसविणे.

डॉ.दिनेश बी. जैन (लोढा)
बी.डी.एस. (मुंबई)
दंत व मुखशल्य चिकित्सक

डॉ.नताशा दि. जैन (लोढा)
बी.डी.एस. (नाशिक)
दंत व मुखशल्य चिकित्सक

पत्ता : प्रेम प्रज्ञा नगर, आयसीआयसी बँकेच्या बाजूस, परळी वै. जि.बीड

मो.7058147084, 9022338691

छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड
कृषि उत्पन्न बाजार समिती किल्ले धारूर जि.बीड

तर्फे सर्व शेतकरी बांधवांना, शेतीमाल खरेदीदार व संबंधीत घटकांना दिपावली निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा

जाहिर प्रगटन

* शेतकऱ्यांना चांगला भाव, ग्राहकांना रास्त भाव व्यवहारासाठी सुविधांची उपलब्धता
* शेतकऱ्यांचा शेतमाल उघड पध्दतीने लिलाव व प्रमाणीत इलेक्ट्रॉनिक वजनमापाने बाजार समितीच्या देखरेखी खाली वजन माप करन्यांना प्रतिबंध.
* बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात मार्केट यार्ड शिवाय इतर ठिकाणी आधिसुचित शेतीमाल खरेदी विक्रीचा व्यवसाय करण्यास प्रतिबंध, विक्री केलेल्या शेतीमालच्या रक्कमेचे त्वरीत वितरण.
* शेतीमाल चांगला वाळवा, शेतीमाल साफ करुण आणा, बाजार भाव आवकीचा कल पहा.
* शेतीमाल सेडधात व सख्यात विंकु नका तर बाजार समितीच्या आवारात विका.
* कापूस खरेदी केंद्रावरच विक्री करा अधिकृत परवाना धारकांना विक्री करा.
* बाजार भाव / कृषि पणन / उत्पादन / उत्पादनोत्तर तंत्रज्ञान विषयक शासकीय योजना बाबतची माहिती व इतर शेती उपयोगी माहिती मार्गदर्शनाचे कृषि पणन मित्र या मासीकाचे (वार्षीक वर्गणी दर रु 200/-) वर्गणीदार होणेसाठी बाजार समितीशी संपर्क साधावा.
* बाजार भावा संबंधी वेब साईड www.msamb.com आणि www.agmarknet.nic.in
* इलेक्ट्रॉनिक भुई काट्याची सुविधा करण्यात आली आहे.
* मुख्य बाजार समिती परिसर किल्ले धारूर CCTV कॅमे-यांच्या निगराणी खाली.



श्री.मंगेश महादेव तोंडे
सभापती



श्री.सुनिल लक्ष्मण शिनगारे
उपसभापती

बाजार समितीची वैशिष्ट्ये

१) शेतीमालाची खुल्या लिलाव पध्दतीने विक्री व वजनमापाची चोख व्यवस्था.
२) तेल बियासाठी प्रसिद्ध बाजारपेठ.
३) मालविक्रीचे तात्काळ पेमेंट.
४) कापूस विक्रेत्या शेतकऱ्यांचे कापसाचे विक्री,वजनमाप व पेमेंटची अद्यावत व्यवस्था.
५) कार्यालयीन कामाकरीता संगणकीकरण
६) शेतकरी व बाजार घटकासाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

श्री.डी.डी.सोळंके - सचिव आणि सर्व संचालक मंडळ

1) श्री. बालासाहेब जाधव 2) श्री. जयदेव तिडके 3) श्री. शिवाजी मायकर 4) श्री. दामोधर धुमाळ 5) श्री. भारत सोळंके 6) सौ. कमल अर्जुन तिडके 7) सौ. सुनीताबाई पंतरी गव्हाणे 8) श्री. सदाशिव बडे 9) श्री. विठ्ठल गोरे 10) श्री. चंद्रकांत भांगे 11) श्री.धनंजय सारखे 12) श्री. रमेश कचरे 13) सौ. शितल लक्ष्मण मोरे 14) श्री.अशोक दरेकर 15) श्री. संदीप शिनगारे 16) श्री. वचिष्ठ कांदे

कृषि उत्पन्न बाजार समिती, किल्ले धारूर जि.बीड

जाहिरात कार्यालयाच्या परवानगीशिवाय प्रसिद्ध करु नये, प्रसिद्ध केल्यास बिल अदा केले जाणार नाही.



दीपावली निमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा

अमोल केदार
पोलिस निरिक्षक,
-* शुभेच्छुक : परळी शहर पोलिस स्टेशन, परळी वै. ता.परळी वै. जि.बीड









"नव्या स्वप्नांची नवी सुरुवात, नव्या संकल्पांची नवी पहाट.

दिपावली निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा



औताडे डिजिटल



-शुभेच्छुक-
बालासाहेब जाधव
(नगराध्यक्ष नगरपरिषद किल्ले धारूर)

दीपावलीच्या मंगलमय शुभेच्छा!

ONKAR SUGAR
Pure by Nature. Honest by Farmers.



प्रकाशाचा उत्सव...
समृद्धीचा संकल्प...
ओंकार ग्रुपचा प्रगतीचा
नवा अध्याय!



शेतकरी बांधवांच्या कष्टांना समृद्धीची जोड देत, सहकार आणि उद्योगविश्वात प्रगतीची नवी शिखरे गाठण्याच्या ध्येयाने ओंकार शुगर समूह आज देशभरातील २७ युनिट सह भक्कम जाळ्यासह यशस्वी वाटचाल करत आहे. या प्रवासात योगदान देणारे सर्व शेतकरी बांधव, अधिकारी, कर्मचारी, व्यापारी, हितचिंतक आणि ग्राहक हेच आमच्या प्रगतीचे खरे भागीदार आहेत.आनंद, उत्साह आणि नवचैतन्याचा संदेश घेऊन येणाऱ्या दीपावलीच्या पावन पर्वानिमित्त ओंकार शुगर समूहातर्फे सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

ओंकार शुगर समूह
२७ प्लांट्स
एक ध्येय
समृद्ध भारताचा संकल्प

मा. बाबुराव बोत्रे पाटील
- चेअरमन : ओंकार साखर कारखाना प्रा.लि,
- युनिट नं. 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23,24,25,26,27
- संस्थापक : अशोक नागरी सह. बँक लि., पिंपरी, पुणे

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — रविवार दि.०८ नोव्हेंबर २०२६ — पान नं.४



आमचं काम हेच उत्तर: सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांचे विरोधकांच्या टीकेला उत्तर

लातूर । प्रतिनिधी

विरोधकांच्या आरोपांना उत्तर देण्यासाठी आमच्याकडे वेळच नाही. आम्ही केलेलं काम हेच आमचं उत्तर आहे. पारदर्शक नोकरभरती हेच आमचं उत्तर. शेतकरी, बचत गट, मजूर संस्था, पतसंस्था एकही घटक जिल्हा बँकेच्या मदतीपासून वंचित राहिला नाही. काय केले ते सर्वांसमोर ठेवले, पुढील पाच वर्षांत काय करणार आहोत हेही समोर ठेवले. अज्ञानी विरोधकांनी कशात आनंद मानायचा ते त्यांनी ठरवावे, अशा शब्दांत सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विरोधकांचा समाचार घेतला.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि.६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहकार पॅनलचा जाहीरनामा सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, विद्यमान चेअरमन धिरज विलासराव देशमुख आणि मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशित करण्यात आला, त्यावेळी सहकारमंत्री ना. बाबासाहेब पाटील बोलत होते.



कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख साहेब, खासदार शिवाजीराव काळगे, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धीरजभैय्या देशमुख, माजी आमदार वैजनाथदादा शिंदे, संचालक अशोकराव पाटील निलंगेकर, महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे, प्रदेश सरचिटणीस शिवानंद तात्या हेंगणे, सिद्धी शुगर व्यवस्थापकीय संचालक अविनाशभैय्या जाधव, अहमदपूर तालुका अध्यक्ष शिवाजीराव देशमुख, बाळासाहेब पाटील चिकटणेकर, अशोकराव गोविंदपुरकर, यशवंतराव पाटील, हेमंतराव जाधव, सर्जेराव मोरे, संभाजीराव सूळ, प्रदेश सरचिटणीस बबनराव भोसले, माजी महापौर दीपक सुळ, अशोकराव काळे, प्रमोद जाधव, पृथ्वीराज शिरसाट, गटनेत्या आशाताई भिसे, यशवंत जाधव सर्व उमेदवार, मतदार उपस्थित होते.

पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की आम्ही आतापर्यंत बँकेमध्ये अत्यंत उत्कृष्ट काम करण्याचा प्रयत्न केला काही तांत्रिक अडचणीमुळे आम्ही जरी बँकेत येऊ शकत नसलो तरी आता येणारी पुढची पिढी ही बँकेला आमच्याच पद्धतीने सर्वोच्च शिखरावर नेल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास सुद्धा राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे संचालक अशोक गोविंदपुरकर यांनी केले. यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, बँकेचे चेअरमन धीरज देशमुख, खा.डॉ. शिवाजीराव काळगे, अशोकराव पाटील निलंगेकर यांनी मनोगत व्यक्त करत जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सहकार पॅनलच्या सर्व १५ च्या १५ उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आभार संचालक अनुप शेळके यांनी मानले.

पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी ऐकून घेतल्या नागरिकांच्या तक्रारी

लातूर । प्रतिनिधी

दिनांक ०६ नोव्हेंबर रोजी पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे जिल्ह्यातील तक्रारदारांशी संवाद साधला. आपल्या जिल्हा भेटी दरम्यान, नागरिकांच्या अडीअडचणी समजावून घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीद्वारे पोलीस - नागरिक यांच्यातील 'संवाद' मजबूत करून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे पोलीस जनता संबंध अधिक दृढ करण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे.

आज रोजी लातूर जिल्ह्याच्या कामगिरीचा मासिक आढावा घेण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक



हे सकाळपासून पोलीस अधीक्षक कार्यालयात उपस्थित होते. या दरम्यान, दुपारी ३ ते ५ या वेळेत त्यांनी जिल्ह्यातील तक्रारदारांशी संवाद साधला. यादरम्यान, एकूण (२५) तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उप महानिरीक्षक यांना सोपविले. यात, मालमत्ता विषयक वाद, मारहाण, दाखल गुन्ह्यांचा तपास, सायबर फसवणूक, पोलीस संरक्षण, कौटूंबिक वाद, जिवे मारण्याची धमकी इत्यादी तक्रारींचा समावेश आहे. प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जाच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच संवेदना ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे. याप्रसंगी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा व शहरातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हे हजर होते.

डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

रेणापूर नाका ते गरुड चौक रस्ता चौपदरीकरणासाठी ३८ कोटींचा निधी मंजूर

लातूर । संतोष सोनवणे

लातूर शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या रेणापूर नाका ते गरुड चौक रस्ता चौपदरीकरणासाठी केंद्रीय रस्ते निधी (उठखऋ) अंतर्गत तब्बल ३८ कोटींचा निधी मंजूर झाला असून, हा निधी मिळविण्यासाठी करण्यात आलेल्या भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. लातूर शहरातील वाढती लोकसंख्या, वाढता वाहनांचा ताण आणि नागरिकांना होत असलेली वाहतूक कोंडी लक्षात घेऊन या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याची मागणी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी सातत्याने शासनाकडे लावून धरली होती. यासाठी त्यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी यांची भेट घेऊन केंद्रीय रस्ते निधीतून (उठखऋ) निधी मंजूर करण्याची मागणी केली होती.



तसेच राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचीही प्रत्यक्ष भेट घेऊन निधी मंजुरीसंदर्भात निवेदन सादर केले होते. संबंधित विभागांशी सातत्याने संपर्क ठेवत पाठपुराव्याची दखल घेत अखेर या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी ३८ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमुळे रेणापूर नाका ते गरुड चौक हा मार्ग अधिक रुंद, सुरक्षित आणि वाहतुकीसाठी सुलभ होणार आहे. परिणामी, शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार असून लातूरच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला नवी गती मिळणार आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

म्हणाल्या, लातूरच्या विकासासाठी मिळवलेला प्रत्येक निधी हा जनतेच्या हिताचा आहे. रेणापूर नाका ते गरुड चौक रस्ता चौपदरीकरणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निधी मंजूर झाला असून याचा लाभ हजारो लातूरकरांना होणार आहे. लातूरच्या सर्वांगीण विकासासाठी माझे प्रयत्न यापुढेही अधिक वेगाने सुरू राहतील. या निधीस मंजुरी दिल्याबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीनजी गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले तसेच अमोल पाटील कौळखेडकर (स्वीय सहाय्यक मा.नितीन जी गडकरी) यांचे डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

पद्मभूषण डॉ. अशोककाका कुकडे यांना माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्याकडून दिवाळीच्या शुभेच्छा

लातूर । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीचे नेते तथा किसान मोर्चाचे गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी लातूर येथील प्रसिद्ध वैद्यकीय, विधायक, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व पद्मभूषण डॉ. अशोक काका कुकडे यांची दिवाळीनिमित्त त्यांच्या सिग्नल कॅम्प परिसरातील निरामय या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी डॉ. कुकडे काका यांना दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा देऊन त्यांच्या उत्तम आरोग्य व दीर्घायुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

महाराष्ट्राच्या व लातूरच्या सामाजिक, शैक्षणिक आणि वैद्यकीय क्षेत्रात पद्मभूषण डॉ. अशोक काका कुकडे यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. वैद्यकीय सेवेला सामाजिक



बांधिलकीची जोड देत त्यांनी आपल्या कार्यातून समाजासमोर सेवाभावाचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या कार्याचा आणि अनुभवाचा समाजाला नेहमीच प्रेरणादायी लाभ होत असतो.

याप्रसंगी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी डॉ.कुकडे काकांनी निस्पृहपणे वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून जे राज्य व देशात कार्य केले ते अविस्मरणीय आहे. देशामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत देश आज जगामध्ये चौथ्या क्रमांकावर असून आश्चर्यकारकपणे कार्य करीत आहे. त्याचप्रमाणे राज्यामध्ये मुख्यमंत्री ना.देवेंद्रजीचेही कार्य त्याच पध्दतीने होत असल्याची भूमिका माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी मांडली. राज्यात व देशातील काही राज्यामध्ये दुष्काळाची भिषण परिस्थिती असून यावेळी लातूर जिल्ह्याच्या दुष्काळी परिस्थितीवरील उपाययोजनेबाबतही चर्चा झाल्याची माहिती माजी आ.कव्हेकर यांनी दिली.

टंचाईमुळे निर्माण झालेली भीषण परस्थिती

वनीकरणामध्ये मुक्या प्राण्याना पिन्याचे पाणीसाठे तात्काळ उपलब्ध करा

औसा । बी.डी. उबाळे

सद्या महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थीती निर्माण झाली असल्याने औसा तालुका दुष्काळाने प्रभावीत समाविष्ट करण्यात अलेला आहेत.



औसा तालुक्यांत आपला कार्यक्षेत्रात येणा-या वनीकरणामध्ये वनाधिकारी यांनी मुक्या प्राण्यांना पाणी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था सध्या केलेली नाही. त्यामुळे पाण्याअभावी पशु-पक्षी प्राण्याचे पाण्याविना हाल होत आहेत, तरी आपण तात्काळ पाण्याची व्यवस्था जलसाठे, पानी हौद, ईत्यादी प्रकारे पाणीसाठे उपलब्ध करुन देण्यात यावेत अशी परमेश्वर श्रीमंत लांडगे, पंचायत समिती सदस्य-तुंगी ता. औसा यांनी केली असून केलेल्या कर्यवाहीचा अहवाल सादर करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

पोदार स्कूलमध्ये पहिली वार्षिक क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न; 'द पॉवर ऑफ वी' संकल्पनेतून एकता आणि सांघिक भावनेचा संदेश!

लातूर । प्रतिनिधी

लातूर येथील पोदार स्कूल, कात पूर रोड येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची पहिली वार्षिक क्रीडा स्पर्धा 'द पॉवर ऑफ वी - व्हेअर टुगेदरनेस बिकम्स अवर ग्रेटेस्ट स्ट्रेंथ' या संकल्पनेवर मोठ्या उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाली. एकता, सांघिक भावना, खिलाडूवृत्ती, चिकाटी आणि एकत्रित प्रयत्नांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, ज्येष्ठ विधिज्ञ ड. नामदेव काकडे, पोदार इंटरनॅशनल स्कूल नांदेडचे प्राचार्य राकेश चौहान, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी समीर साळवे, उपस्थित होते. तसेच अतिथी म्हणून डॉ. आरती झंवर, केदार देशपांडे, दत्ता कोंबडे, जागृती चंदन केरे, राहुल शेटे , मुख्याध्यापिका सायली मेनकुदळे, जगमित्र चे पत्रकार संतोष सोनवणे आणि प्रशासकीय अधिकारी संतोष भटलोंढे यांची उपस्थिती लाभली.

प्राचार्या सौ. रम्या तुटिका यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली या क्रीडा महोत्सवाचे नियोजन करण्यात आले. क्रीडा शिक्षक मुखीद शेख, समन्वयक अमृता राजुरे, कार्यक्रम समन्वयक ममता शर्मा आणि सायली पाटील यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सुरुवात शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण संचलनाने (मार्च पास्ट) झाली. आठवडाभर चाललेल्या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यामध्ये बोट रेस, लीप फ्रॉग जंप, स्नेक रेस, हर्डल्स रेस, ऑक्टोपस रेस आणि रिंग रन यांसारख्या नावीन्यपूर्ण स्पर्धांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विविध स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या क्रीडा कवायतींमधून 'फिट इंडिया', 'गो ग्रीन', 'क्लीन इंडिया', 'सेव्ह वॉटर' आणि 'सेव्ह एनर्जी' असे आरोग्य, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि ऊर्जा बचतीचे महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आले. या सादरीकरणाला उपस्थित मान्यवर आणि प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. या क्रीडा महोत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पालकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष स्पर्धा. वडिलांसाठी क्रिकेट सामना, तर मातांसाठी खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विजेत्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्यामुळे पालकांमध्येही विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक सांस्कृतिक व क्रीडा सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांचा उत्साह, पालकांचा सहभाग, शिक्षकांचे नियोजन आणि मान्यवरांची उपस्थिती यामुळे पोदार स्कूलचा हा पहिलाच वार्षिक क्रीडा महोत्सव अत्यंत यशस्वी ठरला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, क्रीडा कौशल्यांना आणि सांघिक भावनेला प्रोत्साहन देणारा हा सोहळा उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.

फुलोरा स्कूलच्या विद्यार्थ्यांचा कराटे क्षेत्रात गौरव; विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार!

लातूर । प्रतिनिधी

इंटरनॅशनल फुनाकोशी शोटोकान कराटे असोसिएशनच्या वतीने बेल्ट वितरण समारंभ तसेच विभागीय कराटे स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी फुलोरा स्कूल, लातूरच्या विद्यार्थ्यांनी कराटे क्षेत्रात मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. फुलोरा स्कूलच्या मुख्याध्यापिका सावंत मॅडम यांच्या हस्ते प्रगती जाधव, साक्षी मगर, जानवी पारगावे, हर्ष आकडे आणि शाबाज सय्यद या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापिका सावंत मॅडम म्हणाल्या की, आजच्या काळात कराटे ही केवळ एक क्रीडा कला नसून स्वसंरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही प्रावीण्य मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्या पद्धतीने लातूर पॅटर्नने शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे, त्याचप्रमाणे लातूरचा कराटे पॅटर्नही विकसित झाला पाहिजे. येथील खेळाडूंनी राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर लातूरचे नाव लौकिक करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला नवी दिशा मिळत असून, त्यांच्या पुढील स्पर्धांसाठी उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला असोसिएशनचे अध्यक्ष शिहान आजमीर शेख, सेन्सई विशद कांबळे, रेहान शेख, रेश्मा सूर्यवंशी, रहीम शेख आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे फुलोरा स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या पुढील वाटचालीस सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

दुष्काळातही तेजाळू दे आशेचा दीप: संयम, काळजी आणि आत्मनिर्भतेची दिवाळी!

आज लातूर जिल्ह्याचे शिवार आणि मन एकाच वेळी कोरडे पडल्यासारखे भासत आहे. आभाळाने पाठ फिरवल्यामुळे शेतकरीराजा हवालदिल झाला आहे, विहिरींच्या पाण्याची पातळी खालावली आहे आणि ग्रामीण भागापासून ते शहरी वस्त्यांपर्यंत प्रत्येक जण एका अस्वस्थतेतून जात आहे. अशा बिकट आणि आव्हानात्मक परिस्थितीत यंदाचा दिवाळीचा सण आपल्या दारात येऊन ठेपला आहे. एकीकडे सणाचा आनंद साजरा करण्याची इच्छा आणि दुसरीकडे दुष्काळाचे भीषण वास्तव, अशा कात्रीत लातूरकर सापडले आहेत. परंतु, परिस्थिती कितीही हतबल करणारी असली, तरी माणसाचा निर्धार आणि आत्मबल त्याहून अधिक मोठे असते हा संदेश देणारी ही दिवाळी आपल्याला अधिक संयमाने आणि जबाबदारीने साजरी करायची आहे.

१. सणाच्या काळात संयमाची गरज

दिवाळी हा प्रकाशाचा आणि आनंदाचा सण असला, तरी सभोवतालच्या परिस्थितीचे भान ठेवून संयम बाळगणे ही काळाची गरज आहे. ज्या घरात किंवा समाजात आर्थिक अडचणी आहेत, तिथे दिखावा टाळणे म्हणजेच खरा सण समजला पाहिजे. चैतन्याचा हा सण कोणाच्याही दुःखावर मीठ चोळणारा नसावा, तर एकमेकांना आधार देणारा असावा. सण साजरा करताना होणारा अतिरिक्त खर्च टाळून, बचत करणे आणि अत्यंत साधेपणाने आनंद वाटणे हाच या दुष्काळी काळातील खरा संयम आहे.

२. विद्यार्थ्यांनी कशी घ्यावी काळजी?

लातूरचा विद्यार्थी हा या मातीचा कणा आहे. दुष्काळाच्या झळा थेट कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीवर आणि पर्यायाने शिक्षणावर बसतात. अशा वेळी विद्यार्थ्यांनी पुढील गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे:

मानसिक संतुलन: कुटुंबावरील आर्थिक संकटाचा ताण अभ्यासावर किंवा मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ देऊ नका. परिस्थिती बदलण्याची ताकद तुमच्या कष्टांमध्ये आणि शिक्षणात आहे.

आर्थिक शिस्त: नवीन कपडे, फटाके किंवा इतर चैनीच्या गोष्टींवर अट्टहास न करता, पुस्तके आणि शिक्षणाला प्राधान्य द्या. पालकांच्या संघर्षाची जाणीव ठेवून खर्चात काटकसर करा.

सकारात्मक दृष्टिकोन: नैराश्यात न जाता, आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा. आजचा हा कठीण काळ उद्याच्या यशाची पायरी ठरेल, हा विश्वास बाळगा.

३. वृद्ध आणि ज्येष्ठांची विशेष काळजी

दुष्काळ आणि उन्हाच्या तीव्रतेमुळे ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर मोठा ताण येतो. या काळात त्यांची विशेष काळजी घेणे आपले कर्तव्य आहे:

आरोग्याची हेळसांड टाळा: पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेनुसार आरोग्याची काळजी घ्या. डिहायड्रेशन (अशक्तपणा) टाळण्यासाठी वेळेवर पाणी आणि हलका आहार घेणे आवश्यक आहे.

भावनिक आधार: आर्थिक विवंचनेमुळे ज्येष्ठ नागरिक मानसिकदृष्ट्या अधिक संवेदनशील होतात. अशा वेळी कुटुंबातील तरुणांनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांना धीर दिला पाहिजे. त्यांचा अनुभव आपल्याला या संकटातून मार्ग काढायला बळ देईल.

४. प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक दिवाळी

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाचा समतोल राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. रासायनिक फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण आजच्या या नाजूक वातावरणात आरोग्यासाठी घातक ठरू शकते. फटाक्यांना रामराम: फटाक्यांवर होणारा खर्च पूर्णपणे टाळून तो पैसा कुटुंबाच्या किंवा गरजवंतांच्या मदतीसाठी वापरावा. पणत्यांचा प्रकाश: चायनीज रोषणाईऐवजी आपल्या मातीच्या पणत्या पेटवून स्थानिक कुंभारांना हातभार लावावा. दिव्यांच्या या पिवळ्या प्रकाशात जो आपलेपणा आहे, तो कृत्रिम रोषणाईत नाही.

५. पाण्याचा अत्यंत संयमित वापर

लातूरला पाण्याचे महत्त्व कुणीही वेगळे सांगण्याची गरज नाही. यंदा पाऊस कमी झाल्यामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान आहे. दिवाळीच्या साफसफाईमध्ये पाण्याचा अपव्यय टाळावा. वाहन धुणे किंवा रंगरंगोटी करताना पाण्याचा अतिवापर करणे टाळावे.



'जल ही जीवन आहे' हे लक्षात घेऊन पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन करा.

६. खचून न जाता आत्मनिर्भतेने उभे राहणे

लातूरच्या मातीचा इतिहास हा संघर्षाचा आहे. पाणीप्रश्न असो वा इतर कोणतेही संकट, लातूरकरांनी नेहमीच डोकं वर करून संकटांना परतवून लावले आहे. यंदाचा दुष्काळ हा अंतिम नाही. निसर्गाचे हे चक्र बदलणारच आहे. अशा वेळी खचून न जाता, आत्मनिर्भरतेचा मंत्र अंगिकारला पाहिजे.

शेतीला जोडधंदा शोधणे, पशुपालन, लघुउद्योग किंवा स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या पर्यायांचा विचार करणे गरजेचे आहे.

शासनाच्या योजना, सहकार आणि परस्पर मदतीची भावना याद्वारे आपण या संकटावर नक्कीच मात करू शकतो.

चला तर मग.....

यंदाची दिवाळी आपल्याला एक नवीन शिकवण देऊन जात आहे. भव्यदिव्य रोषणाई आणि कर्कश फटाक्यांच्या आवाजापेक्षा, एकमेकांच्या डोळ्यात आशेचा दीप उजळवणे, संकटाशी दोन हात करणे आणि लातूरच्या मातीचा स्वाभिमान टिकवून ठेवणे हेच आपले खरे पर्व असावे. अंधार कितीही गडद असो, एका लहानशा पणतीच्या प्रकाशाने तो दूर होऊ शकतो. हाच आशेचा दीप तेवत ठेवून, यंदाची दिवाळी आत्मनिर्भतेच्या आणि संयमाच्या बळावर साजरी करूया!

श्रीनिवास फडणीस
पत्रकार / वृत्तनिवेदक
लातूर ९२७००१११४००

दैनिक जगमित्र कार्यालय, घर क्र. २०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बुद्ध विहारजावळ, लातूर

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

शेख मौला शेख उस्मान (नांदेड जिल्हा प्रतिनिधी)
मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — रविवार दि.०८ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ५

चोरीला गेलेले व हरविलेले मोबाईल पोलिसांनी शोधून मालकांच्या स्वाधन

कळमनुरी । गंगासागर पंडित

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर पोलीस स्टेशन अंतर्गत चोरीला गेलेले तसेच विविध कारणांनी हरविलेले मोबाईल फोन शोधून काढण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलीस अमलदार अरविंद जाधव यांनी तांत्रिक तपासाच्या आधारे मागील काही काळात सुमारे ५० मोबाईलचा छडा लावून ते हस्तगत केले आहेत.

हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईलपैकी काही मोबाईल संबंधित मालकांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावून त्यांच्या स्वाधीन करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक शरद मरे यांच्या



उपस्थितीत मोबाईल मालकांना त्यांचे मोबाईल परत देण्यात आले. यामध्ये नंदकुमार मगर, बाळापूर तसेच बाळू पौळ, वारंगा फाटा यांच्यासह इतर मोबाईलधारकांना त्यांचे हरविलेले मोबाईल परत मिळाले. मोबाईल परत मिळाल्याने संबंधित नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले.

आखाडा बाळापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत मोबाईल चोरी व हरविल्याच्या घटनांमध्ये वाढ होत असताना पोलीस अमलदार अरविंद जाधव यांनी तांत्रिक तपासाच्या माध्यमातून मोबाईलचा माग काढत ते हस्तगत करण्याची मोहीम राबविली. त्यांच्या या कामगिरीमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पोलीस निरीक्षक शरद मरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अमलदार अरविंद जाधव यांच्यासह पोलीस कर्मचारी मोबाईल चोरी व हरविल्याच्या प्रकरणांचा तपास करीत असून, नागरिकांनी मोबाईल हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास तत्काळ पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

दिवाळी बोनससाठी नांदेड मनपाच्या ९०० कंत्राटी कामगारांचा एल्गार!

कामगार नेते कॉ. गणेश शिंगे यांच्या नेतृत्वात मनपा कार्यालयावर मोर्चा, धरणे, निदर्शने आणि भजन आंदोलन

९ नोव्हेंबरपासून कामबंदचा इशारा!; ८.३३ टक्के बोनसच्या मागणीवर कामगार ठाम

नांदेड । प्रतिनिधी

शहराच्या स्वच्छतेपासून ते पाणीपुरवठा, मलनिःसारण आणि इतर अत्यावश्यक सेवांपर्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडणाऱ्या नांदेड महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांची दिवाळी बोनसअभावी अंधारात जाण्याची वेळ आली आहे. दिवाळीनिमित्त एकूण वेतनाच्या ८.३३ टक्के बोनस मिळावा, या मागणीसाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कामगार कर्मचारी युनियनने आक्रमक पवित्रा घेतला असून, कामगार नेते तथा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कामगार कर्मचारी युनियनचे संस्थापक अध्यक्ष कॉ. गणेश शिंगे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार, दि. ९ नोव्हेंबरपासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. या आंदोलनात घनकचरा व्यवस्थापनासह विविध विभागांतील सुमारे ९०० कंत्राटी कामगार सहभागी होणार असल्याचे कामगार नेते कॉ. गणेश शिंगे यांनी सांगितले. त्यामुळे मनपा प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाचे काम करणाऱ्या मे. अमृत एंटरप्रायजेस कंपनीसह आर अँड बी इन्फ्रा प्रोजेक्ट कंपनीमार्फत विविध विभागांत कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी ऊन, पाऊस आणि सणासुदीची पर्वा न करता घाणीमध्ये काम करणाऱ्या या कामगारांना दिवाळीचा कायदेशीर बोनस मिळावा, यासाठी युनियनने १९ ऑक्टोबर रोजीच मनपा प्रशासनाकडे मागणी केली होती. युनियनच्या निवेदनाची दखल घेत महानगरपालिका प्रशासनाने अमृत एंटरप्रायजेस कंपनीला कामगारांना ८.३३ टक्के बोनस देण्याचे आदेश दिले. त्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी पुन्हा अत्यंत तातडीचे पत्र पाठवून बोनस देण्याची कारवाई करण्याचे निर्देश दिले. अन्यथा करारातील अटी व शर्तींनुसार कारवाई करण्यात येईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले. असे असतानाही बोनसचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही.

दरम्यान, अमृत एंटरप्रायजेस कंपनीने कामगारांना प्रत्येकी पाच हजार रुपये अग्रिम देण्याची तयारी दर्शविली आहे. मात्र, ही रक्कम डिसेंबर २०२६ पासून दरमहा एक हजार रुपये वेतनातून वसूल करण्याचे कंपनीने प्रस्तावित केले आहे. तसेच बोनससाठी आवश्यक निधी महानगरपालिकेने उपलब्ध करून द्यावा, अशी भूमिका कंपनीने मांडली आहे. त्यामुळे बोनस देण्याची जबाबदारी नेमकी कोणाची, यावरून प्रशासन आणि कंपनी यांच्यातील जबाबदारीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कंत्राटदाराने बोनस दिला नाही तर मुख्य नियोक्ता म्हणून महानगरपालिकेने पुढाकार घेऊन कामगारांना त्यांचा हक्क मिळवून द्यावा, अशी युनियनची ठाम भूमिका आहे. आवश्यक ती रक्कम कामगारांना अदा करून नंतर संबंधित कंत्राटदाराच्या सुरक्षा अनामत रकमेतून किंवा देय बिलातून वसूल करण्याची कार्यवाही करावी, असे अशी मागणीही संघटनेने केली आहे.

विशेष म्हणजे, घनकचरा व्यवस्थापनात काम करणाऱ्या कामगारांपैकी बहुतांश कामगार सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांतील असून, त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळणे आवश्यक असल्याचे कामगार नेते कॉ. गणेश शिंगे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

९ नोव्हेंबरला मनपा कार्यालयावर धडक युनियनने जाहीर केलेल्या आंदोलनानुसार ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून कामगार कामबंद करतील. सकाळी ६.३० वाजता वाजता शिवाजीनगर येथील पाण्याच्या टाकीखालील वाहनतळावर सर्व कामगार एकत्र जमतील. त्यानंतर सकाळी ११ वाजता महानगरपालिका कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. मनपा कार्यालयासमोर सभा, धरणे, निदर्शने आणि भजन आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाचे आणखी एक लक्षवेधी वैशिष्ट्य म्हणजे महिला कामगार महानगरपालिका प्रांगणात विटांच्या चुली मांडून दिवाळीचा स्वयंपाक करणार आहेत. तसेच सर्व कामगारांना गोड पदार्थ आणि भोजन देऊन आंदोलनाच्या माध्यमातून आपल्या मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधणार आहेत.

शहरातील स्वच्छता ही अत्यावश्यक सेवा असून, कामबंद आंदोलनामुळे कचरा संकलन आणि साफसफाईवर परिणाम होण्याची शक्यता आहे. परिणामी शहराच्या आरोग्यव्यवस्थेवरही त्याचे परिणाम होऊ शकतात. त्यामुळे ऐन दिवाळीनंतर निर्माण होणारी ही परिस्थिती टाळण्यासाठी मनपा प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी होत आहे. अतिरिक्त आयुक्तांनी मुख्य नियोक्ता म्हणून जबाबदारी स्वीकारून ९०० कामगारांना त्यांच्या एकूण वेतनाच्या ८.३३ टक्के बोनस देण्याची व्यवस्था करावी. कामगारांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा युनियनचे संस्थापक अध्यक्ष कॉ. गणेश शिंगे यांनी दिला आहे. आता मनपा प्रशासन बोनसचा प्रश्न सोडवून कामगारांची दिवाळी गोड करणार की ९०० कामगारांच्या कामबंद आंदोलनामुळे शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न गंभीर होणार, याकडे नांदेडकरांचे लक्ष लागले आहे.

माळकौठ्यातील पीडित कुटुंबाला रोहित पवारांचा आधार!

मुलीच्या उच्च शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली; खासगी फायनान्स कंपन्यांच्या कारभाराच्या एसआयटी चौकशीसाठी प्रयत्न करणार

मुदखेड । अतिख अहेमद

माळकौठा येथील दुर्दैवी घटनेत स्व. चंद्रकांत शिंदे यांच्या निधनामुळे संकटात सापडलेल्या कुटुंबीयांची राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी त्यांनी केवळ सांत्वन करून न थांबता पीडित कुटुंबाच्या भवितव्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मदतीची घोषणा केली. शिंदे यांच्या मुलीच्या पुढील उच्च शिक्षणापर्यंतची संपूर्ण जबाबदारी स्वीकारण्याचे आश्वासन देत कुटुंबाला मोठा आधार दिला. यावेळी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार डॉ. प्रतापसिंह पाटील, आमदार सुनील भुसारा, जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, युवक जिल्हाध्यक्ष धनंजय सूर्यवंशी, शेतकरी संघटनेचे हनमंत पाटील राजेगोरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवानंद पाटील शिप्परकर, शेतकरी संघटनेचे संतोष गव्हाणे, आशिष



कल्याणे, तेजस जाधव, पप्पू पाटील जाधव आदींची उपस्थिती होती.

खासगी फायनान्स कंपन्यांच्या कारभाराची चौकशी होणार?

या घटनेच्या पार्श्वभूमीवर खासगी फायनान्स कंपन्यांकडून होणारी कथित आर्थिक पिळवणूक, कर्जवसुलीच्या पद्धती आणि सर्वसामान्य नागरिकांवर येणारा मानसिक ताण हे प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत. या प्रकरणात संबंधित फायनान्स कंपनीच्या व्यवहारांची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन व्हावे, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

पीडित कुटुंबाच्या पुनर्वसनासाठीही पुढाकार

स्व. चंद्रकांत शिंदे यांच्या पत्नीची इच्छा असल्यास त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून नोकरीची संधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले. त्यामुळे कुटुंबाच्या आर्थिक पुनर्वसनासाठीही मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे.

केवळ आश्वासने नकोत, शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा!

माळकौठा येथील घटना ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका म्हणून पाहून चालणार नाही. खासगी फायनान्स कंपन्या, अनधिकृत सावकारी आणि कर्जवसुलीच्या नावाखाली होणाऱ्या कथित मानसिक छळाच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती रोखण्यासाठी प्रभावी कायदेशीर नियंत्रण, तक्रार निवारण यंत्रणा आणि दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. पीडित कुटुंबाला दिलेली शैक्षणिक व रोजगारविषयक मदत निश्चितच दिलासादायक असली, तरी अशा घटना घडूच नयेत यासाठी शासन आणि प्रशासनाने ठोस पावले उचलणे ही काळाची गरज आहे. अन्यथा एका कुटुंबाला मदत मिळेल; मात्र अशा संकटात सापडलेल्या इतर कुटुंबांचे काय, हा प्रश्न अनुत्तरितच राहील.

डोंगरकडा पुलावर कंटेनरची दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक; ३५ वर्षीय दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू!

कळमनुरी । गंगासागर पंडित

हिंगोली–नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील डोंगरकडा येथील पुलावर शुक्रवारी (दि. ६ नोव्हेंबर) सायंकाळी ठीक ७:४० वाजण्याच्या सुमारास भीषण अपघाताची घटना घडली. पाठीमागून आलेल्या कंटेनरने मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने या अपघातात उमाजी नामदेव कापडे (वय ३५, रा. भेंडेगाव, ता. वसमत, जि. हिंगोली) यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उमाजी नामदेव कापडे हे मोटारसायकलवरून प्रवास करीत असताना डोंगरकडा पुलावर पाठीमागून आलेल्या कंटेनरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर मारोती कदम यांची माणुसकी; तातडीने धाव घेत रुग्णवाहिका बोलावली!

अपघाताची घटना घडताच परिसरात एकच खळबळ उडाली. अपघाताची माहिती मिळताच वरुड येथील



मारोती कदम यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. रस्त्यावर अपघातग्रस्त व्यक्ती गंभीर अवस्थेत असल्याचे लक्षात येताच त्यांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. केळेचे गांभीर्य ओळखून त्यांनी राष्ट्रीय महामार्गाच्या रुग्णवाहिकेला तातडीने संपर्क साधून घटनास्थळी बोलावून घेतले. रुग्णवाहिका येईपर्यंत मदतीसाठी आवश्यक प्रयत्न केले. त्यानंतर रुग्णवाहिकेच्या माध्यमातून उमाजी कापडे यांना पुढील वैद्यकीय प्रक्रियेसाठी डोंगरकडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविण्यात आले.

या घटनेदरम्यान डॉ. कल्याणकर आणि दौलत संतराम कानगोलकर यांनीदेखील मदतीसाठी सहकार्य केले. अपघाताच्या प्रसंगी कोणताही विलंब न करता घटनास्थळी धाव घेऊन मदतीसाठी पुढाकार घेण्यात आला. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली. अपघातस्थळाची पाहणी करून आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. या अपघातातील मोटारसायकलचा क्रमांक एमएच ३८ एसी २७४२ असून, पाठीमागून धडक देणाऱ्या कंटेनरचा क्रमांक डीडी ०१ जे ९५२५ असा आहे. या अपघातप्रकरणी गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून, डोंगरकडा बीटचे जमादार संतोष नागरगोजे हे पुढील तपास करीत आहेत.

महामार्गावरील अपघातांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

राष्ट्रीय महामार्गावर अवजड वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली असून, दुचाकीस्वारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनत आहे. डोंगरकडा पुलावर घडलेल्या या दुर्दैवी अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक सुरक्षिततेबाबत पुन्हा चिंता व्यक्त होत आहे. अपघाताच्या प्रसंगी मारोती कदम यांनी दाखविलेली तत्परता आणि तातडीने रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यासाठी केलेले प्रयत्न हे माणुसकीचे दर्शन घडवणारे ठरले. मात्र, ३५ वर्षीय उमाजी नामदेव कापडे यांच्या दुर्दैवी मृत्यूमुळे भेंडेगावसह परिसरात शोककळा पसरली आहे.

हिमायतनगरला कापूस आयात शुल्काच्या निर्णयाची तहसील कार्यालयासमोर क्रांतीकारी शेतकरी संघटनेकडून होळी



हिमायतनगर । धम्मपाल मुनेश्वर

शासनाकडून शेतकऱ्यांच्या मुळावर उठणारी आयात धोरणे आखण्यात येत आहेत. हा अन्याय किती दिवस सहन करायचा असा सवाल उपस्थित करत क्रांतीकारी शेतकरी संघटनेकडून शासनाच्या जिआरची तहसिल कार्यालयासमोर होळी करून शासनाच्या अन्याय कारक धोरणांचा तिव्र निषेध नोंदविण्यात आला आहे.

सरकारच्या निर्णयाविरोधात हिमायतनगरमध्ये शेतकऱ्यांचा संताप उफाळून आला आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकार्यानी कापसावरील शून्य टक्के आयात शुल्काचा निर्णय डिसेंबर २०२६ अखेरपर्यंत कायम ठेवल्याने देशांतर्गत कापूस बाजारपेठेवर विपरीत परिणाम होण्याची भीती संघटनेने व्यक्त केली आहे. आधीच उत्पादन खर्च, नैसर्गिक संकटे आणि घसरत्या बाजारभावामुळे शेतकरी आर्थिक संकटात असताना परदेशातून स्वस्त कापसाची आयात वाढविण्याचे धोरण म्हणजे देशातील कापूस उत्पादकांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे असल्याचा संताप आंदोलनातून व्यक्त करण्यात आला.

विदेशी कापसाला मोकळे रान, मग भारतीय शेतकऱ्यांनी जगायचे कसे? देशातील कापूस उत्पादकांना त्यांच्या मालाला उत्पादन खर्चाच्या तुलनेत लाभदायक भाव मिळत नाही. अशा परिस्थितीत आयात शुल्क शून्य टक्के करून विदेशी कापसाला भारतीय बाजारपेठेत मोकळीक देणे हा शेतकऱ्यांवर अन्याय असल्याची भूमिका संघटनेने मांडली. कापसावरील शून्य टक्के आयात शुल्काचा निर्णय तातडीने रद्द करून देशांतर्गत कापूस उत्पादकांना संरक्षण द्यावे, अशी मागणी दि.५ गुरूवारी तहसिलदारा मार्फत शासनाकडे करण्यात आली आहे. सोयापेंड आयात थांबवावी व तसेच पोल्ट्री उद्योगाच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर परदेशातून सोयापेंड आयात करण्याच्या हालचालींवरही संघटनेने आक्षेप घेतला आहे. सोयापेंड आयातीमुळे देशांतर्गत बाजारभावावर दबाव निर्माण होऊन सोयाबीनच्या दरात घसरण होण्याचा धोका आहे. त्यामुळे सोयापेंड आयात तातडीने थांबवावी, सोयाबीनला योग्य भाव मिळावा आणि निर्यातीला प्रोत्साहन देणारे प्रभावी धोरण लागू करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी मराठवाडा महिला अध्यक्षा पूजाताई चव्हाण, तालुकाध्यक्ष रामदास शिरफुले, युवा अध्यक्ष अंकुश तिगलवाड, ज्ञानेश्वर सिरपुले, संतोष मोकले यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकर्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या मराठवाड्यात वृक्षारोपणाचा घाट!

मुदखेड–पांढरवाडी रस्त्याच्या दुतर्फा हजारो रोपांची लागवड; पाण्याअभावी ही झाडे जगणार कशी, नागरिकांचा सवाल

मुदखेड । अतिक अहमद

मराठवाड्यात यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. नोव्हेंबर महिन्यातच काही गावांमध्ये पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागल्या असून, पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. अशा परिस्थितीत मुदखेड ते पांढरवाडी या मुख्य रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचे काम सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे. वृक्षारोपणाचा उपक्रम पर्यावरणाच्या दृष्टीने स्वागतार्ह असला, तरी त्यासाठी निवडण्यात आलेल्या वेळेबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे.

रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या संख्येने रोपे लावली जात आहेत. मात्र, सध्या जमिनीतील ओलावा कमी होत असताना आणि पाण्याची उपलब्धता मर्यादित असताना ही रोपे जगविण्यासाठी नेमके कोणते नियोजन करण्यात आले आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. केवळ वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचे उद्दिष्ट पूर्ण होत नाही, तर लावलेल्या प्रत्येक रोपाचे नियमित संगोपन आणि संरक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. एकीकडे ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत



आहे, तर दुसरीकडे रस्त्याच्या कडेला लावण्यात येणाऱ्या हजारो रोपांना नियमित पाणी कसे उपलब्ध करून दिले जाणार, याबाबत स्पष्टता दिसून येत नाही. उन्हाळ्याची तीव्रता वाढल्यानंतर पाण्याअभावी ही रोपे वाळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वृक्षारोपणाचा उपक्रम केवळ कागदोपत्री किंवा औपचारिक स्वरूपात मर्यादित राहू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, या वृक्षारोपणासाठी किती निधी मंजूर करण्यात आला आहे, काम कोणत्या विभागाच्या माध्यमातून सुरू आहे, संबंधित कंत्राटदार कोण आहे आणि रोपांच्या देखभालीची जबाबदारी कोणाकडे सोपविण्यात आली आहे, याची माहिती नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. तसेच पुढील उन्हाळ्यात रोपांना पाणी देण्यासाठी टँकर, ठिबक सिंचन किंवा अन्य पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे का, याबाबतही संबंधित यंत्रणेने खुलासा करावा.

वृक्षारोपणापेक्षा वृक्षसंवर्धन महत्त्वाचे!

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज आहे. मात्र, लावलेल्या रोपांपैकी किती रोपे पुढील काही वर्षे टिकून राहतात, यावरच अशा उपक्रमांचे खरे यश अवलंबून असते. त्यामुळे संबंधित विभागाने वृक्षारोपणासोबतच पाणीपुरवठा, संरक्षण आणि नियमित देखभालीचे ठोस नियोजन करावे. अन्यथा हजारो रोपे लावूनही ती पाण्याअभावी नष्ट झाल्यास वृक्षारोपणाच्या उद्देशालाच हरताळ फासला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुदखेड–पांढरवाडी रस्त्यावरील वृक्षारोपणाच्या कामाकडे संबंधित वरिष्ठ अधिकारी गांभीर्याने लक्ष देणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

नवनिर्वाचित पदवीधर आ. डॉ. प्रतापसिंह पाटील यांचा मुदखेड काँग्रेसच्या वतीने सत्कार!



खासदार रविंद्र दादा चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पुष्पहार घालून अभिनंदन

मुदखेड । तालुका प्रतिनिधी

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार मा. डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांचा मुदखेड शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने आज खासदार मा. रविंद्र दादा चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या सत्कार समारंभास काँग्रेस पक्षाचे जिल्हा सहसचिव गिरीश कोत्तावार, मुदखेड सेवादल तालुकाध्यक्ष गंगाधर पाटील, शहर युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष वेदांत शेवटे, काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते गौस भाई मुल्ला आदी उपस्थित होते. नवनिर्वाचित आमदार डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या माध्यमातून मराठवाड्यातील पदवीधरांचे प्रश्न, युवकांचे प्रश्न तसेच शैक्षणिक व सामाजिक समस्यांना प्रभावीपणे वाचा फोडली जाईल, अशी अपेक्षा यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

उस्माननगर प्रीमियम लींग स्पर्धा सनरायझर्स संघाने पटकावले

उस्माननगर । प्रतिनिधी

रवि जोंधळे यांनी आपल्या फलंदाजी ची छाप टाकुन ४६ धावा काढुन संघास विजयी करण्यात चांगली भागीदारीच्या जोरावर चांगली फलंदाजी करत ९४ धाव संख्येचे लक्ष दिले. रॉयल चॅलेंजर उस्माननगर संघ केवळ ७४ धावसंख्यावर बाद व्होऊन २० धावांनी पराभूत करून सनरायझर्स उस्माननगर संघाने पटकावले. उस्माननगर फ्रेंड क्लब आयोजित उस्मान नगर प्रीमियम लिंक २०२६ पर्व पहिले या क्रिकेट सामन्याचे आयोजन माजी उपसरपंच तथा सम्राट अशोक प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राहुल सोनसळे व माजी सरपंच व सामाजिक कार्यकर्ते अमिन शहा फकीर व फ्रेंड क्लब उस्मान नगर यांच्या संयुक्त विद्यमाने सदरील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत उस्माननगर टायटन्स संघ, रॉयर चॅलेंजर उस्माननगर संघ, सनरायझर्स उस्माननगर संघ, सुपर जेन्टस



उस्माननगर संघ, नाईट रायडर्स उस्माननगर संघ या संघानी सहभाग घेतला होता. सदरील सामने हे साखळी पद्धतीने खेळविण्यात आले. या स्पर्धेतील सामने आठ षटकाचे खेळविण्यात आले. दरोज सामने असल्याने मैदानावर खेळाडू व प्रेक्षकांनी गजबजून जायाचे उस्माननगर प्रीमियम लींग २०२६ पर्व पहिले स्पर्धेतील सामने चुरशीचे व अटीतटीचे होत होते. षटकार आणि चौकार लगातार हॅट्रिक मिळविणाऱ्या फलंदाज गोलंदाजांना पैशाची घोषणा होत होती त्यामुळे सर्वसामान्य हे रोमहर्षक होत गेले नागरिक खेळाडूंनी प्रचंड उत्स्फूर्त टाळ्यांच्या प्रतिसाद देत होते.

स्पर्धेची सुरुवात रॉयल चॅलेंजर्स उस्मान नगर सनरायझर्स उस्मान नगर या दोन संघांमध्ये झाली आणि या स्पर्धेच्या अंतिम २ सामन्याध्ये ४ संघ आले आणि अंतिम सामना रॉयल चॅलेंजर्स उस्मान नगर सनरायझर्स उस्मान नगर या दोन संघा मध्ये झाला. यामध्ये सर्व प्रथम नाणे फेक झाले. रॉयल चॅलेंजर्स उस्मान नगरने गोलंदाजी निवडली व फलंदाजीसाठी आमंत्रण दिले तसेच सनरायझर्स उस्माननगर या संघाने ९४ रनाचे लक्ष देऊन सेकंड इनिंगला चेस करण्यासाठी रॉयल चॅलेंजर उस्मान नगर ला बोलवले रॉयल चॅलेंजर उस्मान नगर ९४ रनाचा पाठलाग करत असताना ७४ धावा पर्यंत त्यांनी मजल मारली व वीस रणनी हा सामना हरला व वीस रणनी हा सामना सनरायझर्स उस्माननगर ने जिंकून पहिल्या वर्षाचा मानकरी पद मिळवलं.

आणि या स्पर्धेला यशस्वी करण्यासाठी गावातील माजी आजी सर्व खेळाडूंनी अतिशय चांगल्या पद्धतीने या ठिकाणी मेहनत घेतली आणि या स्पर्धा अतिशय चांगल्या पद्धतीने पार पाडल्या यामध्ये शेदोदिन तांबोळी, मुस्ताक तांबोळी, अन्सार शेख, सत्तार शेख, इमरान आदमनकर, सेफ अली सिकंदर शेख, देवानंद मोरे, कमलाकर शिंदे पाटील, अंकुश काळम पाटील, सोहेल शेख, अल्ताफ आदमानकर, जाकेर शेख, मोहसीन खान, दस्तगीर शेख, राजू बादवड, अश्फाक तांबोळी, दस्तगीर शेख, साई भिसे, सोन्या वाघमारे, प्रतीक्षिल सोनसळे, मनमत वारकड व तसेच बाहेरगावातील ही खेळाडूंनी या स्पर्धेसाठी आपला सहभाग नोंदवला व सहकार्य केलं त्यामध्ये गंगा मामा, श्रीकांत शिंदे, रामा शिंदे, अनिकेत मानसपुरे, मोंटी जोंधळे, अनिल सर कळकेकर, रवी जोंधळे, कासिम पठाण, श्याम कदम यांनी संघासाठी योगदान दिले विजेता संघास प्रथम पारितोषिक ट्रॉपी, राहुल सोनसळे यांच्या वतीने तर व्दितीय पारितोषिक, ट्रापी अमिनशहा फकीर यांच्या वतीने देण्यात आले. तर ईश्वर डांगे, माधव भिसे, अफरोज आदमनकर, जावेद शेख, साबिर शेख व देवानंद मोरे यांच्या वतीने खेळाडूंना प्रोत्साहन पर बक्षिसे देण्यात आली. यावेळी अशोक काळम, लक्ष्मण कांबळे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक इालासाहे जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, देगलूर नाका, इतवारा, नांदेड महाराष्ट्र ४३१६०४ येथे प्रकाशित केले. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.* पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील. Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

Jagmitra, this newspaper, is printed, published, owned, and edited by Balasaheb Jijaram Kadbane at Jagmitra Offset, near Bajiprabhu Nagar, Nehru Chowk, Parli Vai., Taluka Parli Vai., District Beed (Maharashtra) and published from the Daily Jagmitra office, 9-2-346, Bilal Nagar, Deglur Naka, Itwara, Nanded, MAHARASHTRA - 431604. (The editor may not necessarily agree with the content and news in the daily newspaper. *According to the PRB Act, the responsibility for selecting the content rests with them.) Email:-jagmitra2010@gmail.com

PRGI.No.- MHMAR/26/A0270

6_Layout 1 11/7/2026 10:42 PM Page 1

ग्राम महसूल अधिकारी, संघटना
पाथरी तालुका पाथरी



मा. यशवंत सोडगौर
अध्यक्ष
ग्राम महसूल अधिकारी, संघटना ता. पाथरी

दीपावली निमित्त
हार्दिक शुभेच्छा



मा.श्रीनिवास तायनाक
सचिव
ग्राम महसूल अधिकारी, संघटना ता. पाथरी

उपाध्यक्ष :- विजय भवर्ग, गजानन घाटगे
कार्याध्यक्ष :- राजु नरोटे, रमेश तोंडे
सहसचिव :- अदानान अन्सारी

संघटक :- मांगुलाल चव्हाण
कोषाध्यक्ष :- सय्यद साजिद
महिला महिला :- अस्मीता जाधव, पुजा माने

सल्लागार :- व्ही. व्ही. बिदे, सिद्धार्थ बागूल, मिलिंद विटेकर

सर्व सदस्य :- श्री. खेडकर, जे.डी. मुंढे, सुरेश पैलवान, श्री. शर्मा, श्री. गाडेकर, सुरज ढवळे, श्री. कवठेकर, श्री अनमोड, श्री. कुरेशी, श्री. धम्मपाल गायकवाड, आर. एन. गायकवाड, राहुल सानप, श्री. पाते

दीपावली

निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा !



संदीप लाहोटी, संचालक वैद्यनाथ बँक
मे. हरिराम सत्यनारायण लाहोटी, मोंढा मार्केट परळी वै.





दिवाळीनिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्रा.)

राज्य कार्याध्यक्ष श्री. भगवान जयभाये | जिल्हाध्यक्ष मंगेश जैवळ | सहकार्यवाहक विकास पोथरे

जालना, शाखा मंठा तालुका

ता. अध्यक्ष श्री. कैलास उबाळे | नेते संतोष खेडकर | कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण | कोषाध्यक्ष राजीव हजारे

संघटनमंत्री डिगांबर बरसाले | सहकार्यवाहक अमोल सोनटक्के | महिला प्रतिनिधी ज्योती सल्लोड, मनीषा अवसरमोल

उपाध्यक्ष : अनिल देशमुख, सुनील मोरे, विष्णू राठोड, गजानन चिकाळकर
कार्याध्यक्ष : विनोद गडधे, भगवान बुधवंत, संतोष डोईफोडे, प्रमोद देशमुख
प्रसिद्धीप्रमुख : श्रीकांत माचेवाड, शिवानंद नागरे, राजू राठोड
सहकोषाध्यक्ष : किशोर निर्वळ, खंडोजी गायकवाड
कार्यालयमंत्री : गजानन चिकाळकर, उदय उजैनकर
कार्यवाहक : शिवराम इसनकर
सहकार्य वाहक : मनोज भरडे

आमच्या असंख्य ग्राहकांना व हितचिंतकांना

दिपावली

निमित्त हार्दिक शुभेच्छा !

लक्ष्मीबाई महिला अर्बन
को-ऑप क्रेडीट सोसायटी लि.धारूर
- मुख्य कार्यालय कासारी ता.धारुर जि.बीड -

तालुका कृषी अधिकारी कार्यालय किल्लेधारूर यांच्याकडून

सर्व जनतेस दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा





दीपावली निमित्त
सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा
मल्हार शिवरकर
पोलिस निरिक्षक,
ग्रामीण पोलिस स्टेशन, ता.परळी वै. जि.बीड











दुष्काळाच्या संकटात ७० कुटुंबांना मदतीचा आधार; सलाम इंडिया फाउंडेशन व होनिस्टी मल्टिपर्पज सोसायटीचा स्तुत्य उपक्रम

पिली बस्ती येथे जीवनावश्यक राशन किटचे वाटप; मदतीमुळे गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, सर्वसामान्य कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होत आहे. अशा कठीण परिस्थितीत समाजातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आधार देण्याच्या सामाजिक बांधिलकीतून सलाम इंडिया फाउंडेशन आणि होनिस्टी मल्टिपर्पज सोसायटी, परळी यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाई रोडवरील पिली बस्ती येथील ७० गरजू कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंच्या राशन किटचे वितरण करण्यात आले.



या उपक्रमांतर्गत समाजसेवक तथा जामा मस्जिदचे सचिव इम्रान सर आणि माजी नगरसेवक अनवर मिस्कीन यांच्या हस्ते लाभार्थी कुटुंबांना राशन किटचे वाटप करण्यात आले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कुटुंबांना या मदतीमुळे मोठा दिलासा मिळाला. रोजच्या गरजा भागविण्यासाठी संघर्ष करणाऱ्या या कुटुंबांना आवश्यक किराणा साहित्याची मदत मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून येत होता. राशन किट स्वीकारताना अनेक कुटुंबांनी संस्थांच्या या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून आभार मानले. मदतीचा हात मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य हेच या सामाजिक उपक्रमाचे खरे यश ठरले.

समाजसेवा ही केवळ आर्थिक मदत करण्यापुरती मर्यादित नसून, अडचणीच्या काळात गरजू माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे म्हणजे खरी माणुसकी होय. समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना आवश्यक ती मदत पोहोचविण्याचा सलाम इंडिया फाउंडेशन व होनिस्टी मल्टिपर्पज सोसायटीचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.

यावेळी होनिस्टी मल्टिपर्पज सोसायटी, परळीचे अध्यक्ष इकबाल मिल्ली, मौलाना रेहान काजी यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. या उपक्रमातून सामाजिक एकोपा, सहकार्य आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला. गरजूंच्या घरात अन्नधान्य पोहोचविणे, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे आणि संकटाच्या काळात त्यांना आधार देणे, हीच खऱ्या अर्थाने समाजसेवेची ओळख आहे.

नागडगावचे ग्रामसेवक पाचपुते यांचा वाढदिवस उत्साहात साजरा!

सर्वसामान्य नागरिकांच्या कामांना प्राधान्य देणाऱ्या ग्रामसेवकांचा मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील नागडगाव ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेले ग्रामसेवक श्री. पाचपुते साहेब यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात साजरा करण्यात आला.

ग्रामपंचायत स्तरावर सर्वसामान्य नागरिकांच्या अडीअडचणी समजून घेत त्यांच्या कामांना प्राधान्य देणारे आणि नागरिकांशी आपुलकीने वागणारे ग्रामसेवक म्हणून श्री. पाचपुते यांची ओळख आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त नागडगाव ग्रामपंचायतीचे सरपंच भास्कर जाधव, बालासाहेब उफाडे, विश्वभूषण कांबळे यांच्यासह अनेक सहकारी व हितचिंतकांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत आनंदोत्सवात सहभाग घेतला. यावेळी उपस्थितांनी श्री. पाचपुते साहेब यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि पुढील प्रशासकीय वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. उत्साही वातावरणात हा वाढदिवस सोहळा पार पडला.

मंजरथ जिल्हा परिषद शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी शरद कसबे, तर उपाध्यक्षपदी सोमनाथ सावंत यांची बिनविरोध फेरनिवड

पाथरी । आवडाजी ढवळे

पाथरी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मंजरथ येथे नुकतीच शाळा व्यवस्थापन समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सर्वानुमते एकमताने शाळा व्यवस्थापन समितीच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून, अध्यक्षपदी शरद गंगाधरराव कसबे यांची तर उपाध्यक्षपदी सोमनाथ पंढरीनाथ सावंत यांची बिनविरोध फेरनिवड करण्यात आली आहे.



शाळा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी या नव्या समितीची निवड अत्यंत उत्साहात पार पडली. या समितीवर विविध सदस्यांची देखील निवड करण्यात आली असून, त्यात संदिपान पंडित, राजेश सावंत, अर्जुन सावंत, सरिका हनुमान काळे, लता निलेश वाघमोडे, प्रिया सुंदर मोरे, संगीता अशोक पंडित, पूजा अप्पा साळवे, विजयबाई प्रल्हादराव सावंत, पि.पी. कल्लुरे, मुख्याध्यापक बि.एस. बाबलीकर आणि बाबासाहेब पंडित यांचा समावेश आहे.

या निवड बैठकीच्या प्रसंगी भागवत शिवाजी सावंत, सदाशिव भानुदास बिडगर, पवन प्रकाश पंडित आणि सुधाकर दामु पंडित हे मान्यवर विशेष उपस्थित होते. शाळा व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत भर घालण्यासाठी ही नवी समिती कटिबद्ध राहणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या या फेरनिवडीबद्दल उपस्थित सर्व मान्यवरांनी आणि ग्रामस्थांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



दिवाळी... बळीराजाच्या दारी...

- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : २०.७२ लाख शेतकरी कर्जखात्यांवर १८,०४० कोटी थेट जमा.
- दुष्काळी ५००० रुपये अग्रीम मदत ८७ लाख ४५ हजार शेतकऱ्यांना.
- राज्यात ७.५ एचपी पर्यंतच्या शेतीपंपांना मोफत वीज.
- राज्यात ३८ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा.
- ३०४ तालुक्यात दुष्काळ जाहीर, विविध उपाययोजना लागू, १०० टक्के पंचनामे पूर्ण, धान्यवितरण ९३ टक्के पूर्ण.
- पीएम किसान : ९१.१२ लाख शेतकऱ्यांना १८३५ कोटींचा २४ वा हप्ता नुकताच वितरित.
- उच्च शिक्षण घेणाऱ्या ३ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे शुल्क माफ.

सोबत होतो, सोबत आहोत, सोबत राहू...

शुभ दीपावली



माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन | देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री | एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री | सुनेत्रा अजित पवार उपमुख्यमंत्री

www.mahasamvad.in @MahaDGIPR DGIPR, Govt of Maharashtra /MaharashtraDGIPR

सत्यमेव जयते | महाराष्ट्र शासन | Maharashtra Pollution Control Board महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | माझी वसुंधरा | LiFE Lifestyle for Environment



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

कागदी आकाशकंदील दारी
प्लास्टिकमुक्त दिवाळी घरोघरी

- हरित फटाक्यांचा वापर करावा.
- रुग्णालये, शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालय व न्यायालयांपासून १०० मीटरच्या परिसरात फटाके फोडण्यास बंदी.
- रस्ते, मार्ग, गल्ली, पदपथ यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास बंदी.

समृद्ध दिवाळी पर्यावरणपूरक दिवाळी





देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री | एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री | सुनेत्रा अजित पवार उपमुख्यमंत्री | पंकजा मुंडे मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग @mpcb_official @MPCBOfficial

अधिक माहितीसाठी QR कोड स्कॅन करा

दीपावली

निमित्त सर्व जनतेस

हार्दिक शुभेच्छा

-* शुभेच्छुक *-

योगेश गोपनपाळे

युवा नेते, परळी वै.

आनंदाचा सण आला,
स्नेहाचा सुगंध दरवळला
विनंती आमची परमेश्वराला,
सौख्य, समृध्दी लाभो तुम्हाला...

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!

* शुभेच्छुक *

मा.आ.राजेश धोंडीरामजी राठोड

महासचिव महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटी मुंबई
सदस्य ऑल इंडिया कांग्रेस कमिटी नई दिल्ली

नांदेड जिल्हा पोलिस

महाराष्ट्र पोलीस

आपली सुरक्षा... आमची जबाबदारी...

CEIR CENTRAL EQUIPMENT IDENTITY REGISTER

मोबाईल हरवला किंवा चोरीला गेला? तात्काळ CEIR वर नोंदणी करा!

Lost Mobile? CEIR Portal

CEIR चे फायदे

- हरवलेला / चोरीला गेलेला मोबाईल ब्लॉक करा
- IMEI द्वारे मोबाईलचा मागोवा घेण्यास मदत
- मोबाईलचा गैरवापर रोखता येतो
- मोबाईल सापडल्यानंतर पुन्हा अनब्लॉक करण्याची सुविधा
- हरवलेल्या मोबाईलच्या शोधासाठी पोलिसांना तांत्रिक मदत मिळते.

मोबाईल हरवल्यास काय कराल?

1. जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार / ई-एफआयआर करा.
2. मोबाईलचा IMEI क्रमांक जपून ठेवा.
3. CEIR Portal वर मोबाईल ब्लॉक करण्यासाठी अर्ज करा.
4. अर्जाची स्थिती ऑनलाईन तपासा.

CEIR PORTAL

मोबाईलचे IMEI क्रमांक आयोग सुरक्षित ठेवा. | मोबाईल हरवल्यास विलंब न करता तक्रार नोंदवा. | CEIR वर नोंदणी केल्यास मोबाईलचा गैरवापर रोखण्यास मदत होते.

आपत्कालीन परिस्थितीत DIAL 112 वर संपर्क साधा

आपली सुरक्षा | आपला विश्वास | नांदेड जिल्हा पोलीस सदैव आपल्या सेवेत

पोलीस अधीक्षक, नांदेड | नियंत्रण कक्ष : 02462-234720 | 112

कृषी उत्पन्न बाजार समिती,मंठा

शेतकरी बांधवांना

दिपावली व पाडवा

निमित्त

हार्दिक शुभेच्छा..!



मा.श्री.ए.जे.भाऊ बोराडे
(सभापती-कृ.उ.बा.समिती,मंठा)



मा.श्री.रमेश बोराडे
(सचिव-कृ.उ.बा.समिती,मंठा)



मा.श्री.गोपाळराव भाऊ बोराडे
(उपसभापती-कृ.उ.बा.समिती,मंठा)

बाजार समितीची वैशिष्ट्ये

- मार्केट यार्डामध्ये दररोज शेतमालाचे जाहिर लिलाव
- शेतकऱ्यांच्या मालाचे तात्काळ वजन व रोख चुकोती
- सुसज्ज भव्य ईमारत
- शेतकऱ्यांसाठी शेतकरी निवास
- शेतकऱ्यांसाठी मार्केट यार्डामध्ये पिण्यासाठी फिल्टरयुक्त पाणी
- जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
- सी.सी.आय.खरेदी केंद्र सुरु
- शेतकऱ्यांसाठी शेतमाल तारण कर्ज योजना
- महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळा अंतर्गत हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरु

सर्व सन्माननीय संचालक मंडळ

श्री.पंजाबराव सिताराम केंधळे,श्री.आण्णासाहेब प्रकाशराव खंदारे,श्री.संदीप भुजंगराव गोरे
श्री.प्रल्हाद रेणाजीराव बोराडे,श्री.संतोष रंजीतराव वरकड,सौ.कौशल्याताई तुकारामजी बोराडे
सौ.ज्योतीताई गोपाल सरकटे,डॉ.सौ.स्वाती दत्तात्रय काकडे,सौ.सुनिता कल्याणराव खरात
श्री.पंजाब गणपतराव बोराडे,श्री.दत्ता चोखाजी बनसोडे,श्रीमती सविता सचिन राठोड,
श्री.बाबाराव प्रल्हादराव राठोड,श्री.सतिष राजेभाऊ निर्वळ,श्री.वैजनाथ आबासाहेब बोराडे,
श्री.मुस्तफा गुलामखाँ पठाण

सर्व कर्मचारी वृंद श्री.शाम हजारे,श्री.शिवसिंग छानवाल,श्री.बालासाहेब कुलकर्णी,श्री.अजय जाधव,
श्री.किरण गोरे,श्री.शेख वाजेद,दुर्गेश्वरी बोराडे,लता चव्हाण

सौजन्य
कृषि उत्पन्न बाजार समिती,मंठा
ता.मंठा जि.जालना

Kalash Digital

दीपावली

निमित्त सर्व जनतेस

हार्दिक शुभेच्छा

-* शुभेच्छुक *-

रघुनाथ नाचन

पोलिस निरिक्षक,
परळी शहर पोलिस स्टेशन,
परळी वै. ता.परळी वै. जि.बीड

KALIKA STEEL

ZERO COMPROMISE QUALITY

Kalika FE 550 | 10mm

दिवाळी व पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!

दीपावलीच्या या मंगलमय पर्वावर
आपल्या सर्वांच्या आयुष्यात आनंद,
समृद्धी आणि सकारात्मकतेचा प्रकाश सदैव राहो,
हीच सदिच्छा !

पाडव्याच्या शुभेच्छा !

श्री

मा.श्री घनश्यामजी गोयल

अध्यक्ष स्टील असोसिएशन जालना तथा संचालक कालिका स्टील कंपनी जालना

पाणी आहे तर जीवन आहे, पाणी जपा, पाणी वाचवा...!

नगर परिषद, सेलू जि.परभणी.

सर्व जनतेस दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...!

व्यावर्षी कमी पर्जन्यमान आणी भविष्यात निमार्ण होणारी पाणी टंचाई परिस्थिती पाहता उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व योग्य पद्धतीने वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सेलू नगर परिषद सर्व नागरिकांना नम्र आवाहन करण्यात की

- पाणी भरल्यानंतर नळ तात्काळ बंद करावा व नळाची गळती असल्यास त्वरित दुरुस्ती करावी.
- घरगुती नळ, तोटी व जलवाहिनीतील गळतीकडे दुर्लक्ष करु नये.
- नळ सुरु ठेवून पाणी वाया घालवू नये.
- वाहन धुणे, रस्ते धुणे किंवा इतर अनावश्यक कारणांसाठी पाण्याचा अपव्यय करु नये
- अनधिकृत नळजोडणी करुन पाणी घेऊ नये.
- आपल्या परिसरात पाण्याचा अपव्यय होत असल्याचे आढळल्यास नगर परिषद कार्यालयात तक्रार नोंदवावी.
- पाणी वाया घालविणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
- नागरीकांनी वेळेत बांधकाम परवाना घ्यावा.



श्री. मिलिंद सावंत
नगराध्यक्ष, नगर परिषद सेलू



श्री. साईनाथ बोराडे
उपनगराध्यक्ष, नगर परिषद सेलू



श्री. महेश गायकवाड
मुख्याधिकारी, नगर परिषद सेलू

सर्वश्री नगरसेवक: सुनिता काकडे, अनिकेत जोगदंड, प्रवीणा पवार, विनोद धापसे, पठाण मालनबी, शांताबाई रघुवंशी, दीपक कोल्हाळ, सपना काळे, संदीप लहाने, कमल झमकडे, मनिष कदम, आशा पहाडे, गणेश सवने, मिलिंद पवार, महानंदा आडळकर, कपिल फुलारी, अनुपमा देवधर, सफिया बेगम, पवन आडळकर, पठाण तडवी, शेख रहीमाबेगम, शीला काजळे, तडवी रहेमत, गयाबाई सोनवणे,

स्वीकृत नगरसेवक : श्री. बोराडे विनोद हरिभाऊ ,श्री. काकडे अशोक अन्नासाहेब, श्री. आडळकर हेमंतराव मुरलीधरराव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या.

शुभम गॅलेरिया, शॉप नं. १०१, दुसरा मजला, पिंपरी स्टेशन, पिंपरी, पुणे-१८.

शुभ दसरा

सर्व सभासद व कर्मचारी बंधु-भगिनींना दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा !

ठेवीवर जास्तीत जास्त 9% दराने व्याजदर

कन्यादान ठेव योजना
व्याजदर १०% ते १०.५०%

मध्यम मुदत कर्ज मर्यादा रु. २० लाखापर्यंत
कमीत कमी व्याजदर, कमीत कमी कागदपत्रे
■ त्वरीत कर्ज मंजुरी ■ गतिमान कर्ज वितरण
अल्प मुदत कर्ज मर्यादा
रु. ५० ते ८० हजार त्वरीत बँक खाते वर्ग

संस्थेची आर्थिक स्थिती
(३० सप्टेंबर २०२६ अखेर)

भाग भांडवल	५२.५४ कोटी
ठेवी	६०.०० कोटी
राखीव व इतर निधी	५६.०० कोटी
कर्ज वाटप	१६७.०० कोटी
गुंतवणूक	२८.०० कोटी
लाभांश	१३%
उलाढाल	१९९.८६ कोटी

शुभ दीपावली

"सर्व सभासद व कर्मचारी बंधू-भगिनींना ही दिवाळी लाभदायक व आरोग्यदायी जावो, हीच शुभेच्छा !



मार्गदर्शक
श्री. शशिकांत उर्फ बबनराव झिंजुर्डे
तज्ञ संचालक/अध्यक्ष, पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ
अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य मनपा-नपा-नप-कामगार-कर्मचारी संघटना फेडरेशन



श्री. विजय मुंडे
चेअरमन



श्री. चंद्रकांत भोईर
व्हा.चेअरमन



श्री. भास्कर फडतरे
सेक्रेटरी



श्री. विश्वनाथ लांडगे
खजिनदार



श्री. सनी कवम
संचालक



श्री. शिवाजी वेळवंडे
संचालक



श्री. ज्ञानेश्वर शिंदे
संचालक



श्री. नथा मातेरे
संचालक



श्री. विजय नलावडे
संचालक



श्री. अनिल लखन
संचालक



श्रीमती विजया कांबळे
संचालिका



श्री. कृष्णा पारगे
संचालक



श्री. संदिप कापसे
संचालक



श्री. योगेश रानवडे
संचालक



श्री. विशाल भुजबळ
संचालक



श्री. वैभव वेयकर
संचालक



पै. गणेश गवळी
संचालक



पै. अभिषेक फुगे
संचालक



श्री. युनुस पगडीवाले
स्विकृत संचालक

शुभेच्छुक : सर्व संचालक, सल्लागार, पदाधिकारी व कर्मचारी वृंद

फलेक्स परवाना क्र.: आप/०६/कावि ५६४/२०२६ (दि.०५/१०/२०२६)

जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).